| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ४२ वा | मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## धर्म विचारून चाकूहल्ला

### मुंबईत पहलगामसारख्या प्रकरणाचा उलगडा

**मुंबई/प्रतिनिधी : मुंबईजवळील मीरा रोड परिसरात घडलेल्या चाकूहल्ला प्रकरणाने आता अत्यंत गंभीर वळण घेतले आहे. सुरुवातीला साधा गुन्हा वाटणाऱ्या या घटनेचा तपास आता दहशतवादविरोधी पथकाकडे सोपवण्यात आला आहे. आरोपीच्या घरातून काही संशयास्पद आणि कट्टर विचारसरणीशी संबंधित साहित्य सापडल्याने तपास यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ गुन्हेगारी नव्हे, तर व्यापक सुरक्षेच्या दृष्टीने पाहिले जात आहे.**



या घटनेतील आरोपी ३१ वर्षीय जुबेर अन्सारी असल्याचे समोर आले आहे. घटना घडल्यानंतर काही तासांतच नया नगर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याला अटक केली. त्यानंतर त्याला ठाणे न्यायालयात हजर करण्यात आले असून, न्यायालयाने त्याला ४ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, हा प्रकार २७ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास मीरा रोड (पूर्व) येथील नया नगर भागात घडला.

घटनेच्या वेळी राजकुमार मिश्रा आणि सुब्रतो रमेश सेन हे दोन सुरक्षा रक्षक ड्युटीवर होते. आरोपीने सुरुवातीला परिसरात येऊन मशिदीचा रस्ता विचारल्याचे सांगितले जाते. काही वेळानंतर तो पुन्हा आला आणि एका रक्षकाचा धर्म विचारल्यानंतर अचानक चाकूने हल्ला केला. त्यानंतर तो केबिनमध्ये शिरला आणि दुसऱ्या रक्षकाला कलमा म्हणण्यास सांगितले. तो रक्षक ते म्हणू शकला नाही, तेव्हा त्याच्यावरही हल्ला करण्यात आला. या दोन्ही जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती आहे.

तपासादरम्यान पोलिसांनी आरोपीच्या घराची झडती घेतली असता काही नोट्स आणि दहशतवादी संघटनांशी संबंधित साहित्य सापडले. एका हस्तलिखित नोटमध्ये त्याने अशा संघटनांशी स्वतः ला जोडण्याची इच्छा व्यक्त केल्याचे समोर आले आहे. प्राथमिक तपासात आरोपीने हा हल्ला एका विशिष्ट विचारसरणीच्या प्रभावाखाली केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास अधिक सखोल करण्यासाठी एटीएसकडे वर्ग करण्यात आला आहे.

**जुबेर अन्सारी विज्ञान शाखेचा पदवीधर**

पोलिसांच्या माहितीनुसार, जुबेर अन्सारी हा विज्ञान शाखेचा पदवीधर असून तो काही वर्षे अमेरिकेत वास्तव्यास होता. नोकरी न मिळाल्यामुळे तो भारतात परतला आणि मीरा रोड परिसरात एकटाच राहत होता. तो ऑनलाइन केमिस्ट्रीचे वर्ग घेत होता. मात्र, याच काळात तो इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून कट्टर विचारांकडे वळला असावा, असा संशय तपास यंत्रणांना आहे.

**नोट्समध्ये काही संवेदनशील शब्द**

सध्या तपास यंत्रणा आरोपीचा मोबाईल, इंटरनेट वापर आणि त्याचे संपर्क यांचा बारकाईने अभ्यास करत आहेत. त्याने हा हल्ला एकट्याने केला की त्यामागे इतर कोणाचा सहभाग आहे, हे तपासात स्पष्ट होणार आहे. तसेच, त्याच्या नोट्समध्ये काही संवेदनशील शब्द आढळल्यामुळे त्याचा उद्देश आणि पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकरणात कोणतीही शक्यता नाकारली जात नसून, सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## खासगी शाळांमध्ये आता मराठी शिकवणे बंधनकारक

### नियम मोडणाऱ्या शाळेला बसणार दणका




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांमध्येमराठी भाषा शिकवणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. शासनाने जारी केलेल्या नव्या निर्णयानुसार, इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी विषयाचे अध्यापन आणि अध्ययन सक्तीचे असणार आहे. खासगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मराठी शिकवणे बंधनकारक करण्यात आले असून वारंवार नियम मोडणाऱ्या शाळेला एक लाखाचा दंड, तसेच मान्यताही रद्द केली जाणार आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत मराठी भाषेचे स्थान अधिक मजबूत होणार आहे.

**प्रत्यक्ष पडताळणी होणार**

मराठी शिकवण्यासाठी पात्र शिक्षकांची नियुक्ती करणे शाळांसाठी बंधनकारक आहे. शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षण विभागाकडून प्रत्यक्ष पडताळणी केली जाईल.

**विद्यार्थ्यांना मराठीचे ज्ञान देणे आवश्यक**

राज्यातील सर्व शाळांना मराठी विषय शिकवणे बंधनकारक असून विद्यार्थ्यांना मराठीचे ज्ञान देणे आवश्यक राहील.

मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. सर्व शाळांनी नियमांचे पालन करावे. यासंदर्भात शाळांना कळविले आहे.- संजय जावीर, शिक्षण निरीक्षक

खासगी अनेक शाळा मनमानी करतात. शासनाने हा निर्णय केला त्याचे स्वागत आहे. मात्र, स्थानिक शिक्षण अधिकाऱ्यांनी सक्तीने प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे.- आनंदा होवाळ, अध्यक्ष, इंडियन सोशल संघटना

**कोणकोणत्या शाळांसाठी राहणार नियम लागू?**

सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यम आणि सर्व मंडळांच्या शाळांना हा नियम लागू आहे. १९५ खासगी इंग्रजी शाळा जिल्ह्यात असून नियम लागू राहील.

## प्रभात किरणे

जन्म देती मातापिता
जगवती धरणी
नसे कदर,मोफत
हवा,प्रकाश,पाणी
घडवती माता,
सामावून घेती माती
नको गर्व अहंकार
सारे येथे प्रवाशी
इंजि. नागनाथ
कलवले, लातूर
-इंजि. नागनाथ कलवले लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी यांचा सेनेला जय महाराष्ट्र!

**लातूर/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे लातूर जिल्हा जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी उबाठा गटाला जय महाराष्ट्र करीत एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांच्या या प्रवेशामुळे लातूर जिल्ह्यातील उबाठा गटाला मोठे खिंडार पडले आहे संतोष सोमवंशी यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी आज मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला.

लातूर जिल्ह्याचे प्रमुख संतोष सोमवंशी यांचा उबाठा गटामध्ये कोंडमारा होत होता .गेल्या जिल्हा परिषद निवडणूकी पासून ते पक्षावर नाराज होते .अंतर्गत कलहामुळे त्यांनी उबाठा गटाला जय महाराष्ट्र करण्याचा निर्णय घेतला . आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केल्यामुळे शिंदे सेनेला लातूर जिल्ह्यात पक्ष वाढीसाठी मोठा धक्का मिळणार आहे.

संतोष सोमवंशी यांचे संघटन कौशल्य पाहता शिंदे सेनेला भविष्यात अच्छे दिन पाहायला मिळतील असे बोलले जात आहे. संतोष सोमवंशी हे मूळचे औसा तालुक्यातील धानोरा येथील रहिवाशी आहेत.अनेक वर्ष त्यांनी सरपंच म्हणून चांगला कारभार केला आहे. औसा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती म्हणून त्यांनी चांगली कारकीर्द गाजवली होती. उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख म्हणून त्यांनी पक्ष वाढीसाठी चांगले काम केले होते. अशा एका उमद्या ,तरुण आणि चांगल्या कार्यकर्त्याला उबाठा गट मुकला आहे ,अशी प्रतिक्रिया यावेळी ऐकावयास मिळत आहे.

यावेळी त्यांच्या समवेत बाजार समिती माजी उपसभापती किशोर जाधव, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बसवराज मंगरूळे, संपत बंग, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, श्रीहरी उत्के, रेणापूर माजी सभापती नवनाथ भोसले, रेणापूर तालुकाप्रमुख परमेश्वर सुर्यवंशी, बसवराज बर्दापूरे, निजाम हुच्चे, शिवमूर्ती झुंजे आदी सह असंख्य कार्यकर्ते नी प्रवेश केला.





## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



महाविद्यालयाकडून अतिरिक्त शुल्क लावल्यास ... कारवाईचे आदेश

## चिमटा



दयाचा

अतिक्रमणाच्या विळख्यात लातूर शहर सापडत आहे ! सर्विस रोड बरोबर मेनरोड वरील अतिक्रमण वाढले आहे !!

## शेती विकासासाठी शेत रस्ते दर्जेदार करा

### माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे निर्देश

**लातूर/प्रतिनिधी :** शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही शेतकऱ्याला शेत रस्त्यांची अडचण येऊ नये, यासाठी अधिकाऱ्यांनी अत्यंत दक्ष राहून ही मोहीम राबवावी, असे स्पष्ट निर्देश माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिले.



राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. २७ एप्रिल रोजी सकाळी लातूर शहरातील उपविभागीय अधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना लातूर शहर विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची बैठक संपन्न झाली.

यावेळी लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, लातूर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक साहेबराव नरवाडे, लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, २१ शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, भूमीअभिलेख अधिकारी अशोकराव चव्हाण, वनपरीमंडळ अधिकारी लातूर निलेश बिराजदार, नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, सत्यनारायण पाटील, अक्षय देशमुख, सादुराम मस्के, शंकर कुलकर्णी, लक्ष्मण सपाटे, आनंद पाटील, लक्ष्मण मोरे, राहुल पवार, सचिन सूर्यवंशी आदिसह संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी सर्व मंडळ अधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते पाच प्रगतीशील शेतकरी सादुराम मस्के, शंकर कुलकर्णी, लक्ष्मण सपाटे, राहुल पवार, लक्ष्मण मोरे यांना मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना लातूर शहर विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सर्व नियुक्त झालेल्या सदस्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपविभागीय कार्यालयात प्रारंभी, मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजने अंतर्गत हाती घ्यावयाची कामे आणि सध्या सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यानंतर बोलतांना ते म्हणाले, शेती विकास आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी पानंद रस्त्यांच्या मजबुतीकरणाची मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याला रस्त्याची अडचण येऊ नये यासाठी अधिकाऱ्यांनी अत्यंत दक्ष राहून ही मोहीम राबवावी. हाती घेतलेली कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, सर्व शेत/ पानंद रस्त्यांची नोंद नकाशावर राहील हे पाहावे, या रस्त्यांचे सीमांकन करून घ्यावे, या सर्वच रस्त्यांना क्रमांक द्यावेत अशा सूचना या बैठकीदरम्यान दिल्या आहेत.

लातूर उपविभागीय कार्यालयात लातूरचे नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी भेट घेतली. यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देऊन त्यांच्याशी लातूर जिल्ह्यातील विविध विकास कामासंदर्भात चर्चा केली



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## सत्य माहितीच्या आधारे बोलावे

आपल्या देशात अपुऱ्या माहितीच्या आधारे मत व्यक्त करणारे अनेकजन सापडतील. एकतर अज्ञानापोटी बोलतात, दुसरे माहिती नसताना बोलणारे सापडतील. यापेक्षाही मोठे दुर्दैवी बाब म्हणजे देशात काही का होईना आपणांस प्रसिद्धि मिळविण्यासाठी बोलणारे अनेकजन सापडतील. तातडीने मोठी प्रसिद्धी मिळवायाची झाली तर मोठ्या व्यक्तीवर चुकीची माहितीच्याआधारे मत वक्तव्य करणे! सरळ व सोपा मार्ग अनेकजन वापरतात. मुळात एखाद्या मोठ्या व्यक्तीबाबत चुकीचे वक्तव्य केले तर त्याला अधिक महत्त्व देणारी मंडळी सापडतील. या बाबत विचार केला तर देशाचे काही का होईना? अंतर्गत बंडाळी निर्माण होवू शकते. त्याच प्रमाणे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माणही होवू शकतो. अशांतता निर्माण होवुन तमाशा पाहाणारे कमी नाही. मुळात एखाद्याने चुकीचे वक्तव्य केले तर त्यावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया देवून मोठी प्रसिद्धी मिळवुन देणारे हे दुसरे अविचारी मंडळी सापडतील. मुळात अविचाराने मत व्यक्त केले ते त्याचे वैयक्तिक असते. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. अशा व्यक्तीस समज देणारे सरकार आहे. कायद्याने सत्य काय आहे किंवा कोणत्या आधारे मत व्यक्त केले याचा खुलासा सरकार मागेल. ईतरांनी त्याचे भांडवल करण्याची गरज नाही. आलिकडे ही एक फॅशन बनली आहे. एखाद्याने चुकीचे मत व्यक्त करायाचे व अगोदरच ठरलेली मंडळीने त्याला मोठी प्रसिद्धी देत असतात. एकदा काय झाले एका चित्रपटला मोठी प्रसिद्धी मिळविण्यासाठी एक आयडीआय शोधली. भर चौक अश्लिल चित्र रंगवुन चौकात लटकावले तेही रात्रीच्यावेळी! दुसऱ्या दिवशी सदरील पोस्टरवर चिखल, शेंण फेकण्यात आले. निषेध मोर्चा काढला. त्या चित्रपटाची एवढी प्रसिद्धी झाली, मोठी चर्चा राज्यभर झाली. आपोआप चित्रपट प्रसिद्धीच्या झोकात आला. असे विघ्नसंतोषी मंडळी मोठ्या व्यक्तीवर अपुऱ्या माहितीच्या आधारे किंवा अभ्यास नसताना मत व्यक्त करतात. त्यावर क्रिया व प्रतिक्रिया उमटता असतात. अफाट प्रसिद्धी मिळते. निषेध नोंदविला जातो. जोडे-मारो आंदोलन होते. ही वस्तूस्थिती आहे. अतिशोक्ती नाही. हे जनतेनी समजुन घेतले पाहिजे. जनतेला समजले पाहिजे की, महान व्यक्ती बाबत कोणी काही बोलले तर त्याची किंचितही प्रतिष्ठा कमी होत नाही. जे जनतेच्या मनातील दैवत आहे ते सुर्य-चंद्र असे पर्यंत मनातील दैवत राहणार आहे. त्यामुळे विनाकारण प्रसिद्धि मिळवुन देवू नये, दुर्लक्ष करावे. तरच असे वाचाळ बोलणारे लोक आपोआप कमी होतील. आपणच महत्व द्यायाचे, आपणचे निषेध करायाच हे योग्य नाही या बाबत शांत डोक्यांनी विचार केला पाहिजे. राज्यात, देशात अनेक प्रश्न आहेत. त्याची कायम स्वरूपी सोडवणुक झालेली नाही. असेच प्रश्न लावुन धरले पाहिजेत. राज्यात अनेक समस्या आहेत. त्याची सोडवणुक झाली नाही. वाल्मिक कराडचे प्रकरण, अजित पवार विमान दुर्घटना, अशोक खरात प्रकरण असे विविध प्रकरण रेंगाळली आहेत. निर्णय लागणे बाकी आहे. एक घटनेची चर्चा असताना दुसरी नवीन घटना घडली की, मागील घटनेचा विसर पडतो. वास्तविक माणूस विसरभोळा आहे. हे यावरून दिसते. मुळात आपल्या देशात अनेक घटना विसरल्या गेल्या आहेत. आता त्या आठवत नाहीत. अशात अपुरा इतिहास माहिती असणारी पिढीने वादग्रस्त विधान केले तर नवीन चर्चा सुरु होते जो पर्यंत दुसरी घटना होणार नाही तो पर्यंत पहिल्या घटनेची चर्चा होतच असते. त्यामुळे जनतेनी आता सावध झाले पाहिजे. भारताचा जम्मूकाश्मीरभाग आहे. येथे सत्तर वर्षात तिरंगा फडकला नव्हता किंवा राष्ट्रगीत गायीले नाही त्यावेळी संविधान का विसरले गेले? आपलेच बंधु पंडितांना त्यांच्या आयाबहिणीवर अत्त्याचार करून हाकलून गेले त्यावेळी लोकशाही का कळून आली नाही? मणिपुर दिसते काश्मीर मधील अत्त्याचारी दिसत नाहीत. या बाबत विचार केला जात नाही. दररोज उठायाचे, खायचे, काम करायाचे व झोपायाचे, आपल्याला काय करायाचे? देशात काय चालले आहे. देशात सोडा आपल्या राज्यात काय चालले आहे याचा अभ्यास किंवा विचार केला जात नाही. नाशिकमध्ये महाभयंकर घटना घडली, तरी गप्पच! इतर ठिकाणी अशी घटना घडली का नाही याचा विचार नाही. त्यामुळे महात्माजींने तीन माकडाचे चित्र शालेय अभ्यास दिसून आले ते म्हणजे डोळे असून आंधळे, तोंड असून मुके, कान असून बहीरे! म्हणजे डोळ्यावर, तोंडावर व कानावर हाता! असेच चित्र सध्याला दिसून येत आहे. हे योग्य नाही. सर्वजन गुण्यागोविंदाने राहातो आहे. यात फुट नको. फुट पडली तर काय होते हे माहिती असू शकते. त्यामुळे जे अविचाराने, इतिहासाची माहिती नसताना बोलतात, त्याबाबत अधिक प्रसिद्ध देण्याचे कटाक्षाने टाळावे. जनता अविचाराने, एखाद्या महात्म्यासारखी प्रसिद्धी देतात. त्यानी समाजासाठी काय कार्य आहे. दानशूर आहे का? किंवा रतन टाटा सारखे दानाचे काम करतो काय? न पहाता असे बोलले तसे बोलले म्हणून प्रसिद्धी दिली जाते हे योग्य नाही. बरेच जन असेही बोलतात हे धोक्यात ते धोक्यात आहे. असे म्हणणे म्हणजे आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न आहे हे ओळखले पाहिजे. देशात असे भोंदू आहेत की, चांगल्या-चांगल्यास लुबडतात. अंधविश्वासू आहेत. अज्ञानी मंडळी बळी पडली तर चालेल, मात्र शिकलेली मंडळी, उच्च महिलांसाठी मोठे पद वाले सुद्ध बळी पडतात हेच भारताचे मोठे दुर्दैव आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी काय सांगितले, शिका, संघटित व्हा व संघर्ष करा. लबाड मंडळींस जनतेनी ओळखले पाहिजे, संधीसाधू कोण आहे. आपला हक्क कसे हिरावुन घेत आहेत. राजर्षी शाहू महाराज दलिताच्या हॉटेलमध्ये दररोज चहा पिण्यासाठी येत होते. तलाठीच्या परिक्षेत महर्षी दयानंद सरस्वती लिखित 'सत्यार्थप्रकाश' पुस्तकावर परिक्षा व प्रश्नावली ठेवली होती. असे कार्य तर आता होतच नाही. जनता मोठी हुशार आहे, ते आपल्या फायद्या व स्वार्थासाठी पाहिजेच तेच स्विकारले जाते. इतरांना वेड्यात काढण्याचे काम होत आहे. त्यामुळे वेळीच सावध झाले पाहिजे. देश आतून पोखरला जात आहे. वेळीच सावध झालो नाही तर काय विपरीत होईल हे सांगण्याची गरज नाही. अनेकांना नाशिक प्रकरण समजले आहे. राज्यातील प्रकरणे माहिती आहेत. त्यामुळे सावध होवून विनाकारण एखाद्याला मोठी प्रसिद्धी देवून मोठे करणे चुकीचे आहे हे जाणून घेतले पाहिजे.

## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या घेतल्या भेटी




**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. २७ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्थाचे पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेत त्यांच्या निमंत्रनाचा स्वीकार केला, तसेच संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष एडवोकेट किरण जाधव, लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर एडवोकेट स्नेहल उटगे, गटनेते विजयकुमार साबदे, विलास को-ऑपरेटिव बँक व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, माजी महापौर दीपक सुळ, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विकास कांबळे, एडवोकेट अतिश चिकटे, अल्लाबक्ष शेख, नारायण कांबळे, सतीश साळुंखे, भालचंद्र सोनकांबळे, सुपर्ण जगताप, प्राध्यापक शिवाजी जवळगेकर, राहुल पवार, अब्दुल खदीर शेख, सिकंदर पटेल, संजय बावगे, नर्सिंग बुलबुले, वीरभद्रआप्पा कल्याणी, गोविंद कांबळे, किसन सगर, रोहित माने, मालबा घोणसे, मनोज कदम, प्रशांत पाटील, अग्निवेष शिंदे, सुनील बडूरकर, विजयकुमार धुमाळ, सुनील बसपुरे, बंदेनवाज सय्यद, गोविंद देशमुख, सुरज पांचाळ, दत्ता सोमवंशी, बालाजी मुस्कावाड, विठ्ठल पावडे, अक्षय देशमुख, विलास कदम, प्रताप पाटील, राम चामे, एडवोकेट अंगद गायकवाड आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी सचिन बंडापल्ले यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल सचिन बंडापल्ले यांनी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचे आभार मानले.

यावेळी नगरसेवक युनूस मोमिन, नगरसेवक फारूक शेख, नगरसेविका शहनाज गोलंदाज, नगरसेविका अंकिता भडीकर, व्यंकटेश् पुरी, सत्यवान कांबळे, आसिफ गोलंदाज, प्रशांत भडीकर, निजाम शेख, बब्रुवान गायकवाड आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## दयानंद कॉमर्स कॉलेज, बीसीए विभागातर्फे मेस्ट्रो प्रोजेक्ट एक्झिबिशन अँड पोस्टर प्रेझेंटेशन कॉम्पिटिशन संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कॉमर्स कॉलेजच्या बीसीए विभागातर्फे बीसीएच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मेस्ट्रो प्रोजेक्ट एक्झिबिशन अँड पोस्टर प्रेझेंटेशन कॉम्पिटिशन उत्साहात आयोजित करण्यात आली. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मानणीकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे अकॅडमी डेव्हलपमेंट ऑफिसर डॉ. जयप्रकाश दरगड यांनी उपस्थिती दर्शवली.

मेस्ट्रो प्रोजेक्ट एक्झिबिशन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून राजर्षी शाहू कॉलेजचे समन्वयक डॉ. विश्र्वनाथ पांचाळ व प्रा. रियाज शेख उपस्थित होते. तसेच पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभाग प्रमुख डॉ. रेणुका लोंढे यांनी कार्यभार सांभाळला.

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर विविध उपयोजनांसाठी (Applications) प्रकल्प सादर केले. तसेच पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेमध्येही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्कृष्ट सादरीकरण केले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी बीसीए विभाग प्रमुख डॉ. शशिकांत स्वामी व बीबीए विभाग प्रमुख डॉ. वैशाली सातपुते तसेच बीसीए विभागातील सर्व प्राध्यापकांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी व नवकल्पनांना चालना देणारा ठरला.

## ज्ञान पंढरीचा वारकरी - प्रा. डॉ. सुब्राव जाधव सर



सकस विचार आणि संस्कार विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आयुष्यभर पेरणारे , आणि कामात तल्लीन होऊन हसतमुख असणारे हे आनंद यात्री प्रा.डॉ. सुब्राव जाधव सर प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

खरंतर आमचा सहवास खूप दीर्घ स्वरूपाचा आहे. तो खूपच दृढ आणि सकस वैचारिक देवाणघेवाण करणारा आहे. जीवनामध्ये मोठे व्हायचे असेल तर समोरच्या व्यक्तीला क्षणामध्ये माफ करण्याची क्षमता आपल्यामध्ये असली पाहिजे ,अशा प्रकारचा सल्ला अनेक सहवासातील विद्यार्थ्यांना आणि मित्रपरिवाराला ते द्यायचे आणि आजही देत आहेत. ज्यावेळी लोक आपले नाव पाठीमागे चांगले किंवा वाईट समजून काढत असतील तेव्हा आपण मोठे होत आहोत हे नेहमी लक्षात घ्यायचे असे ते सांगत. आपणाला लोक वाईट म्हणत असतील तर वाईट आपण नसतो , तर त्या लोकांची विचारसरणी वाईट असते. असे ते वारंवार सांगत असत.मोठ्या होणाऱ्या व्यक्तीला छुपे दुश्मन खूप असतात, त्यांच्याकडे नेहमी आपण दुर्लक्ष करायचे असते.

सरांची भाषण करण्याची कला खूपच छान आहे.ते जेव्हा कार्यक्रमांमध्ये भाषणासाठी उभे राहायचे तेव्हा काही क्षणांमध्ये समोरच्या व्यक्तींना खळखळून पोटभर हसवायचे.कधी कधी स्वतःवर विनोद करायचे,स्वतःवर विनोद करून घेण्याची क्षमता आणि धाडस खूपच कमी लोकांमध्ये असते.त्या कमी लोकांमध्ये प्रा.डॉ. एस.एन.जाधव सर हे एक आहेत.भाषण करत असताना त्यांची मांडणी खूपच नेटकी असायची.

विनोदी भाषणात काना मनाला वेड लावणारी त्यांची भाषा विद्यार्थ्यांना आपलीशी वाटायची.त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये विद्यार्थी, काम आणि समाजकार्य याला खूपच महत्त्व दिले आहे.

भ्रम्हाची ओळख झाले की, अज्ञानाची निवृत्ती होते आणि अज्ञानाची निवृत्ती झाली की, त्याच क्षणी परमानंदाची प्राप्ती होते. अध्यात्माचे केंद्र मनाला संकटावर मात करायला शिकवते.श्रद्धेने पिंपळाच्या पानावर जग तारण्याची ताकद निर्माण होते. अशा प्रकारचे सर्व सहवासातील मित्रांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून नेहमी सकारात्मक करत असत.

विद्यार्थ्यांना ज्ञानरूपी अमृत देताना, गाडीतून मैदानात येऊन हातात बॅट घेऊन सचिन तेंडुलकरची नक्कल करणारा श्रीमंत घरातला पोरगा आणि आपल्या आईचा दाळ भाकरीचा बसमधून येणारा डबा घेणारा पोरगा ,मोलकर्णीचा पोरगा ,सफाई कामगाराचा पोरगा,शेतमजुराचा पोरगा यामध्ये त्यांनी कधीच भेदभाव केला नाही. मालदांडीच्या ज्वारीच्या भाकरीवर पोसलेलं पोरग , कोकणातल्या भाताला ज्ञानाच्या क्षेत्रात मागे टाकेल अशी ताकद त्याच्या मेंदूमध्ये आपण आपल्या प्रदीर्घ सेवेमध्ये निर्माण केली.

शिक्षण हा अलंकार आहे.शिक्षणाने माणूस मोठा होतो शिक्षणाने व्यक्तिमत्व घडते आणि शिक्षणानेच दोन मुलांचा बाप होण्याअगोदर ४० मुलांचा प्राध्यापक होऊ शकतो अशा स्वरुपाची आपण आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या मनामध्ये विचारांची पेरणी केली. समोरच्या व्यक्तीला ओळखण्याची ताकद आपल्या मध्ये आहे.खरंतर आपण रत्नपारखीच आहात.काही क्षणांमध्ये समोरच्या व्यक्तीला आपण ओळखू शकता. ही दैवी शक्ती आपणाला ईश्वराने दिलेली आहे.आज जरी आपण नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असला, तरी देखील आपण शिक्षण क्षेत्रापासून आणि समाजकार्यापासून कधीही दुरावले जाणार नाहीत असा माझा ठाम विश्वास आहे.

चांगल्याला चांगले वाईटाला देखील चांगले असे सकारात्मक दृष्टिकोन असणारे निस्वार्थी व बुद्धी वैभवाने तेजाळलेले हे व्यक्तिमत्व शिक्षण क्षेत्रातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहे.सर आपले आरोग्य निरोगी राहो. आपल्या आयुष्यात सुख समृद्धी येवो आणि आपणाला दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



**- प्रा.डॉ. मारुती अभिमान लोंढे**
**(अर्थशास्त्र विभाग प्रमुख,रामकृष्ण परमहंस महाविद्यालय ,धाराशिव )**

## घरात आढळणारी 'ही' एक गोष्ट वाढवते लिव्हर कॅन्सरचा धोका? तज्ज्ञांनी दिला गंभीर इशारा; सर्वाधिक धोका कोणाला?



यकृत (लिव्हर) आपल्या शरीरातील महत्त्वाचा अवयव आहे. हा अवयव निरोगी राहिल्यास शरीरही निरोगी राहते. मात्र, गेल्या काही वर्षात यकृताशी संबंधित आजारांचे प्रमाण वाढले आहे. यकृताचा कर्करोग हा प्रामुख्याने वयोवृद्धांमध्ये दिसणारा आजार मानला जात होता; परंतु तरुणांमध्येही या आजाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे. मद्यपानाचे वाढते प्रमाण, बदलती जीवनशैली, लठ्ठपणा हे यासाठी मुख्य कारणीभूत घटक आहेत.

मात्र, आता संशोधकांनी घरात आढळणाऱ्या एका रसायनाविषयी सांगितले आहे. हे रसायन यकृताच्या कर्करोगाचा धोका वाढवत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. घरात सहज आढळून येणारे हे रसायन कोणते? याचा सर्वाधिक धोका कोणाला? धोका टाळण्यासाठी काय करावे? हे सविस्तर समजून घेऊयातष्ठ

**नवीन अभ्यासातून धक्कादायक माहिती उघड**

युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाच्या 'केक मेडिसिन'मधील संशोधकांनी केलेल्या एका नवीन अभ्यासात असे दिसून आले आहे की, टेट्राक्लोरोएथिलीन (पीसीई) नावाच्या रसायनाच्या संपर्कात आल्याने यकृताच्या 'फायब्रोसिस'चा धोका तिप्पट होऊ शकतो. हे रसायन ड्राय क्लीनिंगमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते आणि घरगुती उत्पादनांमध्ये (जसे की क्राफ्ट करताना चिकटवण्यासाठी वापरला जाणारा पदार्थ, डाग काढणारे क्लीनर व स्टेनलेस स्टील पॉलिश).

'फायब्रोसिस'मुळे यकृताचा कर्करोग आणि यकृत निकामी होणे यांसारख्या जीवघेण्या समस्या उद्भवू शकतात. या अभ्यासानुसार, रक्तामध्ये पीसीईचे प्रमाण जितके जास्त असेल, तितके यकृताचे नुकसान होण्याची शक्यता अधिक असते. विशेष म्हणजे ज्या लोकांमध्ये दारू पिणे, लठ्ठपणा किंवा हेपॅटायटिस यांसारखे धोक्याचे घटक नाहीत, त्यांच्यातही पीसीईमुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो.

**पीसीई काय आहे आणि त्यामुळे यकृतावर काय परिणाम होतात?**

पीसीई हे एक कृत्रिम, रंगहीन द्रव स्वरूपातील रसायन आहे. त्याचा वापर औद्योगिक स्तरावर मोठ्या प्रमाणात केला जातो. बहुतेक लोक ड्रायक्लीन केलेल्या कपड्यांद्वारे या रसायनाच्या संपर्कात येतात. हे रसायन कालांतराने हळूहळू हवेतही मिसळू शकते. तसेच, कारखान्याच्या कचऱ्यामुळे किंवा अयोग्य विल्हेवाटीमुळे ते माती आणि भूगर्भातील पाण्यामध्ये मिसळू शकते. त्यामुळे पिण्याचे पाणीदेखील पीसीईच्या संपर्कात येऊ शकते.

इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर (आयएआरसी) पीसीई या रसायनाला कर्करोगजन्य रसायन म्हणून वर्गीकृत केले आहे. त्याचा संबंध मूत्राशयाच्या कर्करोग, नॉन-हॉजकिन लिंफोमा व मल्टिपल मायलोमाशी जोडलेला आहे. यापूर्वीच्या संशोधनात यकृताच्या कर्करोगाचा वाढलेला धोकादेखील सूचित करण्यात आला होता. नॅशनल हेल्थ अँड न्यूट्रिशन एक्झामिनेशन सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार जवळजवळ सात टक्के लोकांच्या रक्तामध्ये पीसीई हे रसायन आढळून आले.

हा अभ्यास २०१७ ते २०२० मधील आकडेवारीवर आधारित असून, २० वर्षे व त्याहून अधिक वयाच्या प्रौढांचा या अभ्यासात समावेश होता. त्याव्यतिरिक्त ज्यांच्यामध्ये पीसीईच्या संपर्काचे प्रमाण आढळले, त्यांना गंभीर यकृत फायब्रोसिस होण्याची शक्यता तीन पट जास्त होती. पीसीईच्या संपर्कात आल्यास यकृत खराब होण्याचा धोका वाढतो, असेही अभ्यासात नमूद करण्यात आले.

**याचा सर्वाधिक धोका कोणाला?**

अभ्यासात नमूद केले आहे की, उच्च-उत्पन्न असलेल्या कुटुंबातील लोक या रसायनाच्या संपर्कात येण्याची शक्यता अधिक असते. कारण- ते ड्रायक्लीनिंग सेवांचा जास्त वापर करतात. ड्रायक्लीनिंग सुविधांमध्ये काम करणाऱ्या कामगारांनाही जास्त काळ आणि थेट संपर्क असल्यामुळे पीसीईचा धोका अधिक असतो. परंतु, पीसीई असलेली घरगुती उत्पादने वापरणाऱ्या किंवा दूषित पाण्याच्या स्रोताजवळ राहणाऱ्या कोणालाही याचा धोका असू शकतो.

मद्यपान न करणाऱ्या आणि चयापचय विकार नसलेल्या व्यक्तीलाही यकृतसंबंधित रोगाचे निदान झाल्यास ते गोंधळात पडतात. मात्र, हे विशिष्ट संशोधन पर्यावरणात आढळणाऱ्या रसायनांच्या महत्त्वावर प्रकाश टाकते, ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. त्याव्यतिरिक्त हे देखील या अभ्यासातून स्पष्ट होते की, यकृत तपासणी, कामाच्या ठिकाणी व घरातील वातावरणात आढळून येणाऱ्या रासायनिक संपर्काबद्दल माहिती असणे किती आवश्यक आहे.

**धोका टाळण्यासाठी काय करावे?**

सुरक्षिततेच्या वाढत्या चिंतांमुळे, युनायटेड स्टेट्स एन्व्हायर्न्मेंटल प्रोटेक्शन एजन्सीने ड्राय क्लीनिंगमधील पीसीईचा वापर १० वर्षात टप्प्याटप्प्याने बंद करण्याची सुरुवात केली आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रातील त्याच्या वापरावर निर्बंध लादले आहेत. परंतु, हे रसायन अजूनही काही उत्पादनांमध्ये आणि अनेक देशांमध्ये सहज वापरले जात आहे. संशोधक या रसायनांच्या धोक्याविषयी जागरूकता वाढवण्याची आणि इतर पर्यावरणीय विषारी रसायनांचा तपास करण्याची गरज असल्याचे सांगतात.

या रसायनाच्या संपर्कात असलेल्या लोकांनी लवकर तपासणी केल्यास यकृताचे नुकसान टळू शकते. आरोग्य तज्ज्ञ ग्राहकांना घरगुती साफसफाईचे आणि क्राफ्ट उत्पादनांवरील लेबल तपासण्याचे आणि शक्य असेल, तेथे पीसीईचा संपर्क कमी करण्याचे आवाहन करतात. पीसीईसारख्या दैनंदिन रासायनिक संपर्काविषयी जागरूकता वाढवणे महत्त्वाचे आहे. कारण- अशा धोक्यांना समजून

# वजन कमी आणि सौंदर्यासाठी आवळ्याचा जादुई फॉर्म्युला

मुंबई : शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग्य आणि संतुलित पोषण मिळणे अत्यंत आवश्यक असते. व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने परिपूर्ण असलेला आवळा हा आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त मानला जातो. केस, त्वचा आणि पचनाशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यासाठी आवळ्याचा वापर फायदेशीर ठरतो. आहारात आवळ्याचा समावेश अनेक प्रकारे करता येतो – काहीजण तो भाजी स्वरूपात खातात, तर काहींना कच्चा आवळा खाणे आवडते.



रस तयार करण्यासाठी लागणारे साहित्य – आवळा, कच्ची हळद, आले, कढीपत्ता आणि काळी मिरी. हा रस तयार करण्याची पद्धत अगदी सोपी आहे. एका आवळ्यासोबत कच्च्या हळदीचा एक छोटा तुकडा, आल्याचा तुकडा आणि चिमूटभर काळी मिरी घ्या. हे सर्व घटक मिक्सरमध्ये एकत्र वाटून रस तयार करा. सकाळी रिकाम्या पोटी हा रस प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात.

दररोज या रसाचे सेवन केल्याने त्वचेला नैसर्गिक तेज येते, केस मजबूत व मऊ राहतात आणि वजन कमी होण्यासही मदत होते. जर तुम्हाला केसगळती कमी करायची असेल आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणायची असेल, तर या पेयाला तुमच्या दिनक्रमाचा भाग जरूर बनवा.वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत आवळ्याची भूमिका महत्त्वाची आहे. तो शरीरातील चयापचय वाढवतो आणि चरबी जळण्याची गती सुधारतो. याशिवाय भूक आणि अनावश्यक खाण्याची इच्छा नियंत्रित ठेवण्यासही तो मदत करतो. त्यामुळे निरोगी केस, त्वचा आणि सडपातळ शरीर हवे असल्यास आवळ्याचा आहारात नियमित समावेश करा.

# दही आणि ताक या दोन्हीपैकी उन्हाळ्यात पोटाच्या आरोग्यासाठी काय भारी ?



उन्हाळ्याचा तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे अनेकजण उन्हाळ्यात दही आणि ताक घेणं पसंत करतात. उन्हाळ्याची सुरुवात होताच बऱ्याच घरांमध्ये जेवताना नियमितपणे दही किंवा ताकाचं सेवनं करतात. या दोन्ही पदार्थांमध्ये प्रोबायोटीक्स अर्थात पोटासाठी फायदेशीर ठरणारे बॅक्टेरिया असतात. मात्र, फार कमी लोकांना हे माहित आहे की यापैकी आपल्या पोटाच्या आरोग्यासाठी नेमकं काय फायदेशीर आहे? चला तर जाणून घेऊयात दही आणि ताक या दोन्हींपैकी नक्की काय फायदेशीर ठरेल याबद्दल.

दह्यात प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. जर तुम्हाला वजन वाढवायचं असेल किंवा हाडे मजबूत करायची असतील, तर दही उत्तम आहे. आयुर्वेदानुसार, दही हे निसर्गात उष्ण प्रवृत्तीचं मानलं जातं. दही खाल्ल्यानंतर पोटातील उष्णतेमुळे त्याचे आंबवण्याचे कार्य वाढते, ज्यामुळे काही लोकांना सिडिटी किंवा पोट फुगणे यांसारख्या समस्या उद्भवतात. दहीमध्ये ऊर्जेचं स्तोत्र मोठ्या प्रमाणात असतं. पण हे पचनासाठी जड मानलं जातं.

जर तुम्हाला दही खायचे असेल, तर ते दुपारच्या जेवणात खावं. रात्री दही खाणं टाळावं, कारण यामुळे कफ वाढण्याची शक्यता असते.

ताक हे दह्यापासून बनवलं जातं. पण त्यामध्ये पाणी मिसळ्यामुळे आणि घुसळ्यामुळे त्याचे गुणधर्म पूर्णपणे बदलतात. आयुर्वेदात ताकाला 'तक्र' म्हटलं जातं, ज्याची तुलना अमृताशी केली गेली आहे. दह्याच्या विरुद्ध, ताक हे निसर्गात अत्यंत शीत अर्थात थंड असतं. हे शरीराचं तापमान त्वरित कमी करण्यास मदत करतं आणि ताक पचायलाही हलकं असतं. जर तुम्हाला अपचन, गॅस किंवा सिडिटीचा त्रास असेल, तर ताक हे सर्वोत्तम पेय आहे. उन्हाळ्यात शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाईट्स घामाद्वारे बाहेर पडतात. ताक प्यायल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते आणि थकवा दूर होण्यास मदत मिळते.

उन्हाळ्यात दह्यापेक्षा ताक पिणं जास्त फायदेशीर ठरतं. दही हे पचायला जड असल्यानं उन्हाळ्यात पचनशक्ती मंदावलेली असताना ताक घेणं अधिक फायदेशीर ठरतं.



# ओडिशा बनतेय स्टील उत्पादनाचे हब

वेदांता ॲल्युमिनियमने ओडिशातील झारसुगुडा येथे प्रस्तावित वेदांता ॲल्युमिनियम पार्कमध्ये उत्पादन युनिट्स स्थापन करण्यासाठी दोन कंपन्यांसोबत सामंजस्य करार केला. या करारावर 'सिंघल स्टील अँड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड' आणि 'एससीओटी-एएल मेटकॉन प्रायव्हेट लिमिटेड'ने स्वाक्षर्या केल्या. या प्रसंगी ओडिशाचे उद्योगमंत्री संपद चंद्र स्वैन आणि अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग) हेमंत शर्मा उपस्थित होते.

वेदांता ॲल्युमिनियमने एका निवेदनात म्हटले आहे, की झारसुगुडामध्ये वेदांता ॲल्युमिनियम पार्क स्थापन करण्यामागे मूल्यवर्धनाला चालना देणे, 'एमएसएमई' च्या वाढीस पाठिंबा देणे आणि ओडिशाची जागतिक ॲल्युमिनियम केंद्र म्हणून ओळख अधिक मजबूत करणे हा उद्देश आहे. या उपक्रमामुळे पाचशे कोटी रुपयांपेक्षा जास्त नवी गुंतवणूक येण्याची आणि सुमारे १,५०० थेट तसेच अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

'वेदांता ॲल्युमिनियम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी राजीवकुमार यांनी सांगितले, की प्रस्तावित पार्क कंपनीच्या प्राथमिक उत्पादनापासून पुढे जाऊन मूल्यवर्धित उत्पादनाकडे वाटचाल करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. प्रस्तावित वेदांता ॲल्युमिनियम पार्क ओडिशाची औद्योगिक मूल्यसाखळी मजबूत करण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. शर्मा यांनी सांगितले, की पायाभूत सुविधांची तयारी आणि धोरणात्मक पाठिंबा यांचा संगम करून आम्ही उद्योगांना कार्यक्षम आणि स्पर्धात्मक पद्धतीने पुढे जाण्यास सक्षम करेल, असा मंच तयार करत आहोत.

५६ एकरात प्रकल्प- 'वेदांता झारसुगुडा'चे 'सीईओ' सी. चंद्रू यांनी सांगितले, की हा प्रस्तावित पार्क डाउनस्ट्रीम इकोसिस्टिम मजबूत करेलच, पण शाश्वत उपजीविकाही निर्माण करेल, उद्योजकतेला चालनाही देईल आणि प्रदेशाच्या विकासात योगदानही देईल. वेदांता ॲल्युमिनियम पार्कच्या पहिल्या टप्प्याचा विकास सुमारे ५६ एकर क्षेत्रामध्ये होणार असून त्याचा उद्देश ॲल्युमिनियम मूल्यसाखळीत नवी संधी निर्माण करण्यासाठी औद्योगिक क्षमता आणि

# 'आप'ले झाले परके

'आप'चे दहापैकी सात सदस्य भाजपत 'विलीन' झाल्याने पक्षांतरबंदी कायद्याच्या कचाट्यातून ते सुटले आहेत. केजरीवाल यांच्या एककल्लीपणामुळे विरोधी आघाडीचेही नुकसान झाले आहे.

आम आदमी पक्षाचे राज्यसभेतील सात सदस्य भारतीय जनता पक्षात सामील झाल्याने आधीच संकटात असलेल्या त्या पक्षाला जबर धक्का बसला आहे. या फुटिरांचे नेतृत्व राघव चड्ढा यांनी केले. ते पक्षाचे राज्य सभेतील उप नेते होते. त्या पदावरून त्यांना सुमारे तीन आठवड्यांपूर्वीच 'आप'ने हटवले होते. आपल्यासह सातजण भाजपमध्ये 'विलीन'होत असल्याचे चड्ढा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यापैकी सहाजण पंजाबमधून आले आहेत. हे उल्लेखनीय आहे. स्वाती मालिवाल दिल्लीच्या आहेत. या पक्षाचे राज्यसभेत दहा सदस्य होते. 'आप' ला आपण रक्त व घामाने वाढवले. मात्र, तो पक्ष आता आपल्या मूळ तत्त्वांपासून भरकटला असल्याचा आरोप चड्ढा यांनी केला. हे (भाजपचे) गलिच्छ राजकारण असल्याचा आरोप 'आप'चे राज्य सभेतील नेते संजय सिंग यांनी करणे स्वाभाविक आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी या फुटिरांचा उल्लेख 'विश्वासघातकी' (गद्दार)असा केला आहे. पक्षाचे निमंत्रक, खरे तर सर्वेसर्वा, अरविंद केजरीवाल यांनी अजून तरी, या घटनेवर प्रतिक्रिया दिलेली नाही. नव्या सदस्यांच्या आगमनामुळे भाजपची या सभागृहातील सदस्य संख्या ११३ व 'एनडीए'ची १४२ झाल्याने त्यांचे बहुमत प्रस्थापित झाले आहे. यामुळे विरोधी पक्ष तेथे अधिक कमकुवत बनले आहेत.

केजरीवाल हे कारण?

राघव चड्ढा हे भाजपच्या बाबतीत सौम्य भूमिका घेतात अशी टीका केजरीवाल व मान यांनी करून त्यांना उपनेतेपदावरून दूर केले होते. त्यानंतर पक्षात 'वादळ' होण्याची शक्यता पक्षातील काही जणांनी व्यक्त केली होती. केजरीवाल यांच्यावर नाराज होऊन चड्ढा बाहेर पडले, हे उघड आहे. अशोक कुमार मित्तल हे पंजाबातील बडे उद्योगपती आहेत. शिक्षण क्षेत्रातही ते आहेत. अंमलबजावणी संचालनालयाने त्यांच्या कार्यालयांवर नुकतेच छापे घातले होते. स्वत:ला वाचवण्यासाठी त्यांनी भाजपच्या वळचणीला जाणे पसंत केले असावे.



स्वाती मालिवाल या केजरीवाल यांच्या निकटवर्ती होत्या. केजरीवाल यांच्या विरुद्ध उत्पादन शुल्क धोरण प्रकरणी कारवाई सुरू झाल्यानंतर स्वाती यांचे केजरीवाल यांच्याशी बिनसले. त्यांच्या निवासस्थानी आपल्यावर हल्ला झाला, गैरवर्तन झाले असे आरोप स्वाती यांनी केले होते. पक्ष सोडण्याची 'योग्य वेळ'त्यांनी साधली असे म्हणता येते. क्रिकेटपटू हरभजन सिंग राजकीयदृष्ट्या सक्रिय कधीच नव्हता. जेथे तो असेल त्या पक्षाला एक प्रसिद्ध चेहेरा लाभतो यापलीकडे त्याचा विशेष उपयोग नाही. 'आप'ला खरा धक्का संदीप पाठक यांच्या जाण्याने बसला आहे. सरचिटणीस हे पद ते केवळ सांभाळत नव्हते तर, त्यांनी प्रसिद्धीपासून दूर राहून आपची संघटना उभी केली. ते पक्षाच्या गाभा समितीचे सदस्य होते. पंजाबमध्ये २०२२ मध्ये 'आप'ला सत्ता मिळण्यात चड्ढा व पाठक यांचा वाटा मोठा आहे. तेथील सुमारे निम्म्यापेक्षा जास्त आमदारांना या दोघांपैकी एकाने उमेदवारी दिली होती.

तरी, पाठक यांना अचानकपणे पंजाब शाखेच्या प्रमुखपदावरून दूर केले गेले. मान यांच्याशी त्यांचे मतभेद असल्याचे बोलले जात होते. त्यांनी गेल्या आठवड्यात केजरीवाल यांची भेट घेतली. तेव्हा पक्षाच्या राज्य शाखेकडून फार प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार केल्याचा अंदाज आहे. सत्तेत आल्यानंतर पक्षाची सूत्रे केजरीवाल यांच्या हातात एकवटली असल्याचे मत काहीजण खासगीत व्यक्त करत होते. दिल्ली व पंजाबच्या विजयानंतर भाजपला आपणच हरवू शकतो, असा अहंकार केजरीवाल यांच्यात निर्माण झाला. त्यांनी 'इंडिया' आघाडीपासून फारकत घेतली. काँग्रेसलाही ते शत्रू समजू लागल्याने ते एकटे पडले. परिणामी 'आप'ने दिल्लीची सत्ता गमावली. उत्पादन शुल्क प्रकरणात ते निर्दोष ठरले असले तरी, त्यांचे पाठिराखे त्यांच्यापासून दुरावले हे सत्य आहे. पंजाबात पुढील वर्षी निवडणूक होत आहे. तेथील संघटना सांभाळणारे नेते फुटल्याने ती निवडणूक 'आप'ला जड जाणार हे नक्की. भाजप व काँग्रेसवर अंतर्गत सत्तेच्या केंद्रीकरणाचा आरोप करणारे केजरीवाल त्याच मार्गाने गेले. अंतिमत: त्यांचे विश्वासू सहकारी त्यांना सोडून गेले.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



स्त्री-पुरुष समागम ही प्रजोत्पादनाच्या उद्देशाने घडून येणारी क्रिया. परंतु, या क्रियेपलीकडे जाऊन लैंगिकता आणि लैंगिक सुखाच्या कल्पनेनेही माणसाचे जगणे व्यापलेले आहे. अर्थात, लैंगिक सुख हेच आणि एवढेच माणसाचे जगणे नसले तरीही ते टाळून जगण्यालाही पूर्णत्व नाही, या विचारांतून खरं तर लैंगिक स्वातंत्र्याच्या, ङ्गसेक्शुअल फ्रीडममच्या

## २ Joke विनोद




त्याचीही सोय-पैसे संपवायचे कसे म्हणून फुटरमलने एक आलिशान हवेली बांधायचे ठरविले. शेटजीच्या ङ्गाठोड्याफ चा अंदाज घेऊन आर्किटेक्टने बंगल्याचा नकाशा बनविला. मोठे प्रवेशद्वार, देवघरं, जिने, बगीचे सगळी आखणी समजावून देत त्याने फुटरमल शेटजींना नीट पटवले. पोहण्यासाठी तीन तलाव दाखविलेले पाहून शेटजी म्हणाले. आंघोळीला तीन तीन तलाव कशाला? आम्ही तर चार चारजण आहोत.फ्फ एका तलावात गरम पाणी, थंडीच्या दिवसांत तो वापरायचा, आर्किटेक्ट म्हणाला. दुसऱ्यात गार पाणी राहिल खास उन्हाळ्यासाठी. ठीक आहे, असू दे पण हा तिसरा शेटजींनी विचारले. ङ्गङ्गजेव्हा आंघोळच करायची नसेल, तेव्हा हा तिसरा वापरायचा आर्किटेक्टन प्लान सांगितला.

## ३ Message संदेश



Kid: Aunty Mummy Nay cheeni Maangi Hai
Aunty: cheeni Detay Huway,Acha Aur kya kaha Mummy Nay?
Kid: Ager Wo kameeni Na Day, Tou Pinky Aunty say Lay Aana

## ४ Thought सुविचार




आयुष्यात निश्चित काही मिळवावयाचे असल्यास साहस असावयास पाहिजे. अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

संपन्नतर मेवान्नं दारिद्रा भुज्जते सदा !
क्षुत्वादुतां जनयति सा चाढ्येषु सुदुर्लभा !!

अर्थ- गरीब लोक नेहमी अत्यंत चविष्ट अन्नाचे ग्रहण करतात. खूप कष्ट करपरूशन त्यांनी जी भूक लागते, त्या भुकेनेच त्यांचे अन्न स्वादिष्ट बनते. अन्नाची ही चव (कष्ट न करणाऱ्या) धनाढ्यांना दुर्लभ असते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. अभिवादनाचा 'साहेबी' प्रकार
४. 'वृद्धत्वी निज शैशवास जपणे' हा बाणा जपणाऱ्यांना मिळणारा ताशेरा
७. यथासांग, चारीठाव
१०. काडीमोड, ताटातूट
१२. श्रीराम सेनेतील सदस्य
१४. पद्धत
१७. करवंदाचे रान
१८. हालचालीवर ठेवलेली नजर
१९. मनातील काळेबेरे
२१. पोथीचे वाचन
२२. पातक
२३. नकोशा आठवणी
२५. सेवक
२६. स्तुती
२७. स्तुती करण्याजोगे
२९. मातृभाषा
३१. शपथ
३२. योग्य
३३. ढग (हिंदी)
३५. पांगापांग, विनाश
३९. बंदुकीची फैर, तंबाखुची गोळी
४०. भिस्त
४२. मुंबईचा घरगडी
४३. बाळभाषते पाणी
४४. रागाचा स्फोट
४६. सामूहिक व्यायाम
४७. फक्त, केवळ
४८. हावरटपणा
५०. नवरदेव
५१. काढलेली सुट्टी
५२. राक्षस
५४. अथवा, किंवा
५५. मृदा
५६. तारतम्य, प्रसंगावधान
५८. मेंढपाळ
५९. सकस, सत्वयुक्त
६१. गरज
६२. रानटी
६४. चिंता, काळजी
६५. भुकटी, पूड
६६. अखखा उभा भारत!
६९. जन्मजात गोंडसपणा
७०. गांधारीचे पुत्र
७१. प्रतिष्ठा, आदर
७२. अग्नी, '--तो चेतवावा रे'
७३ स्तुती करणारा
७४. पूजन केले
७५. विद्या
७७. उंच पट्टीतील आवाज
७९. सौंदर्य
८०. या दोन्हीची काळवेळ माणसाच्या हाती नसते!
८१. मुक्काम, मुक्कामाचे ठाणे

### उभे शब्द

१. खरडपट्टी (ला.)
२. सुईबरोबर धावणारा
३. फायदा
४. रिकामपणाची भावना
५. मग्न, गुंग
६. चेष्टाखोर
७. अमसुलाचे-टोमॅटोचे देशी सूप
८. तीव्र राग
९. बारा वर्षांचा काळ
११. पूर्वपरवानगीने घेतलेली सुट्टी
१३. नम्रतेने मान खाली घातलेला
१५. शोध, माग
१६. दुर्लक्ष, हेळसांड
१८. किमान काळ दर्शवण्यासाठी हिच्या लावण्याचा आधार घेतला जातो
१९. सुडौल
२०. एकाग्र नजर
२२. अपमान
२४. लहरीनुसार आखलेला बेत
२५. गयावया करणे
२६. रक्षक, सांभाळणारा
२८. शक्यतेप्रमाणे, शक्य होईल तितके
२९. सामान
३०. डोंगर पोखरून काढलेला रस्ता
३१. याच्यामुळे जाडी वाढते असा समज गैर आहे
३४. दार, कवाड
३६. निव्वळ ओझी वाहणारा
३७. ही फक्त जेवायला न मिळाल्यानेच होते असे नाही!
३८. घसरगुंडीबरोबरचा खेळ
४०. लोकशाहीतील महत्त्वाचे 'देणे'
४१. श्री विष्णूचे एक नाव, रमापती
४३. राहुटी, तंबू
४५. भित्रा, कच खाणारा
४९. अधिक श्रेष्ठ, वरचढ
५३. पालिकेतील लोकप्रतिनिधी
५७. त्रागा
५८. कृतकृत्य झालेला
५९. आवरण
६०. मदीरा
६१. न तापलेले दूध
६२. रंग
६३. थोरवी
६४. निऱ्यांचा नाहीतर कामाचा!
६५. खंत, हुरहूर
६६. अजगर
६७. सन्मानाची रक्कम
६८. त्वरित, चटकन
६९. लोक
७०. शाकारणी करावे लागणारे घर
७३. आपला देश
७६. शरम
७८. राख

### आडवे उत्तरे

१.हस्तांदोलन ४.पारावार ७.सरसरीत १०.फारकत १२.वानर १४.रीत १७.माळी १८.पाळत १९.वात्रट २१.पारायण २२.पाप २३.कप २५.दास २६.वाखाणणी २७.स्तवनीय २९.मायबोली ३१.भाक ३२.यथार्थ ३३.बादल ३५.वाताहत ३९.बार ४०.मदार ४२.रामा ४३.पापा ४४.भडका ४६.कवायत ४७.मात्र ४८.लसलस ५०.वर ५१.रजा ५२.दानव ५४.वा ५५.माती ५६.पोक ५८.धनगर ५९.कसदार ६१.सकल ६२.वन्य ६४.साप ६५.कर्ण ६६.आसेतु हिमाचल ६९.जनक ७०.कौरव ७१.मान ७२.वचन ७३.भाट ७४.कमला ७५.कला ७७.तारस्वर ७९.रुप ८०.जननमरण ८१.तळ

### उभे उत्तरे

१.हजेरी २.दोरा ३.नफा ४.पाकळी ५.रात ६.रवाळ ७.सर ८.सर्वत्र ९.तप ११.रमा १३.नतमस्तक १५.तपास १६.हयगय १८.पापणी १९.वाचनीय २०.टक २२.पाणउतारा २४.पल्ला २५.दादा बाबा करणे २६.बाली २८.यथासंभव २९.माल ३०.बोगदा ३१.भात ३४.दरवाजा ३६.हमाल ३७.उपासमार ३८.काका ४०.मतदान ४१.रमावर ४३.पाल ४५.डरपोक ४९.सरस ५३.नगरसेवक ५७.कलकलाट ५८.धन्य ५९.कवच ६०.दारू ६१.सपक ६२.वर्ण ६३.महिमा ६४.सान ६५.कटकट ६६.आर ६७.मानधन ६८.लवकर ६९.जनता ७०.कौलारू ७३.भारत ७६.लाज ७८.रक्षा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### एम.एस. धोनी आयपीएल मधून बाहेर?

**मुंबई**–आयपीएल २०२६ मध्ये चेन्नई सुपर किंग्सचे चाहते ज्या क्षणाची आतुरतेनं वाट पाहत होते, त्याला आता विलंब होत असल्याचं दिसत आहे. एम.एस. धोनीच्या पुनरागमनाबद्दल मोठ्या अपेक्षा होत्या, पण एका नवीन धक्क्यामुळं त्याच्या पु–नरागमनाला विलंब झाला आहे. चेन्नई सुपर किंग्सचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी खुलासा केला आहे की, धोनीच्या पुनरागमनाला होणाऱ्या विलंबाचं कारण म्हणजे त्याच्या पोटरीच्या दुखापतीचा पुन्हा झालेला त्रास. स्पर्धेपूर्वी या दुखापतीमुळं धोनी फक्त दोन आठवडे संघाबाहेर राहील अशी अपेक्षा होती, पण आता जवळपास एक महिना उलटून गेला आहे आणि सीएसकेनं आठ सामने खेळले आहेत, ज्यात धोनी एकदाही खेळलेला नाही. सराव सामन्यात पुन्हा दुखापत : क्रिकबझच्या वृत्तानुसार, संघाच्या पाचव्या पराभवानंतर माध्यमांशी बोलताना फ्लेमिंग यांनी खुलासा केला की, सराव सामन्यादरम्यान धोनीची दुखापत पुन्हा उफाळून आली, ज्यामुळं त्याच्या पुनरागमनाला पुन्हा एकदा विलंब झाला. धोनीच्या पुनरागमनाबद्दल प्रशिक्षक म्हणाले की, तो खूप उत्सुक आहे, पण पोटरीच्या दुखापती कठीण असू शकतात.

### आता रोहितच मुंबईला वा-चवणार... हिटमॅनचे कमबॅक

**मुंबई**–आयपीएल २०२६ मध्ये मुंबई इंडियन्सची कामगिरी निराशाजनक झाली आहे. मुंबई इंडियन्सना या मोसमात आतापर्यंत ७ पैकी फक्त २ सामने जिंकता आले आहेत, तर ५ सामन्यांमध्ये त्यांना पराभवाचा धक्का बसला आहे. पॉईंट्स टेबलमध्ये मुंबई नवव्या क्रमांकावर आहे. आयपीएलच्या या मोसमात मुंबईने केकेआरविरुद्ध विजय मिळवून दणक्यात सुरूवात केली, पण त्यानंतर लागोपाठ ४ सामन्यांमध्ये मुंबईचा पराभव झाला, गुजरातविरुद्धचा सामना जिंकून मुंबई पुन्हा एकदा विजयाच्या ट्रॅकवर आली, पण सीएसकेविरुद्ध मुंबईला पुन्हा पराभवाचा धक्का बसला.मुंबईचा स्टार ओपनर रोहित शर्मा दुखापतीमुळे मागच्या काही सामन्यांमध्ये खेळत नाहीये, याचा फटकाही टीमला बसला आहे. १२ एप्रिलला आरसीबीविरुद्ध झालेल्या सामन्यात रोहित शर्माला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली, त्यानंतर रोहित लागोपाठ ३ सामन्यांमध्ये खेळू शकला नाही. रोहित शर्मा खेळत नसल्याचा परिणाम मुंबईच्या बॅटिंगवरही झाला आहे. पंजाब किंग्स, गुजरात आणि सीएसकेविरुद्धच्या सामन्यात मुंबईला चांगली ओपनिंग मिळाली नाही. टीमने युवा खेळाडू दानिश मालेवार याला संधी दिली, पण दोन सामन्यांमध्ये दानिश मालेवार याला फक्त २ रनच करता आल्या आहेत.

### राजधानी हादरली! १३ धावांत ६ विकेट्स...

**दिल्ली**–अरुण जेटली स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या आयपीएल २०२६ च्या ३९ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी यजमान दिल्लीचा डाव क्षणात उद्ध्वस्त केला. नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा रजत पाटीदारचा निर्णय भुव–नेश्वर कुमार आणि जोश हेझलवूड या जोडीने सार्थ ठरवला. फक्त ५.३ षटकांच्या खेळात दिल्लीचे ६ फलंदाज अवघ्या १३ धावांवर तंबूत परतले.
भुवनेश्वर आणि हेझलवूडची भेदक गोलंदाजी सामन्याच्या सुरुवातीपासूनच बंगळुरूच्या वेगवान गोलंदाजांनी चेंडू दोन्ही बाजूंनी स्विंग करत दिल्लीच्या फलंदाजांना खेळणे अशक्य केले. अनुभवी भुव–नेश्वर कुमारने आपल्या पहिल्याच षटकात साहिल पारखला बाद करून दिल्लीला पहिला धक्का दिला. त्यानंतर आलेल्या केएल राहुल आणि नितीश राणा यांनाही खेळपट्टीवर स्थिरावण्याची संधी मिळाली नाही.
दुसऱ्या टोकाकडून जोश हेझलवूडने दिल्लीच्या मधल्या फळीला उद्ध्वस्त केले. हेझलवूडने आपल्या स्पेलमध्ये सलग धक्के देत केएल राहुल (१), समीर रिझवी (०) आणि भरवशाच्या नितीश राणाला (१) माघारी धाडले. दिल्लीची अवस्था एका वेळी ३ बाद २ धावा अशी अत्यंत दयनीय झाली होती.

### ३६व्या वर्षी भुवीचा दिल्लीला दणका

मुंबई–आयपीएल २०२६ च्या ३९ व्या सामन्यात आज दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन बलाढ्य संघ आमनेसामने आले आ–हेत. या सामन्यात आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय आरसीबीच्या गोलंदाजांनी पहिल्याच षटकात योग्य ठरवला आहे.दिल्ली कॅपिटल्सने आजच्या सामन्यात युवा खेळाडू साहिल पारखला पदार्पणाची संधी दिली होती. मात्र, पारखसाठी हे पदार्पण एखाद्या वाईट स्वप्नासारखे ठरले. आरसीबीचा अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारने आपल्या अनुभवाचा पुरेपूर वापर करत डावाच्या सुरुवातीलाच दिल्लीला मोठा धक्का दिला. दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध त्याने केलेल्या भेदक माऱ्याने सर्वांची मने जिंकली आहेत. काही दिवासाआधी त्याच्या या कामगिरीनंतर माजी भारतीय क्रिकेटपटू मोहम्मद कैफने मभुवीफच्या टीम इंडियातील पुनरागमनासाठी वकिली केली होती आहे.भुवनेश्वरचा तो ममॅजिकलफ चेंडू षटकातील दुसऱ्याच चेंडूवर भुवनेश्वरने साहिल पारखचा

# केवळ दोन तासांच्या आत मॅरेथॉनचा विक्रम!




सेबॅस्टियन सावेचा ऐतिहासिक पराक्रम

केनियाच्या सेबॅस्टियन सावेने लंडन मॅरेथॉन २०२६ मध्ये इतिहास रचला. त्याने १ तास, ५९ मिनिटे आणि ३० सेकंदात मॅरेथॉन पूर्ण करून, दोन तासांपेक्षा कमी वेळेत धावणारा पहिला पुरुष खेळाडू बनण्याचा मान मिळवला. ३१ वर्षीय सावेने, दिवंगत केल्विन किप्टम यांनी २०२३ च्या शिकागो मॅरेथॉनमध्ये नोंदवलेला २:००:३५ चा पूर्वीचा जागतिक विक्रम मोडला.
इथिओपियाचा योमिफ केजेलचा १:५९:४१ वेळेसह दुसऱ्या स्थानी राहिला. त्यानेही दोन तासांपेक्षा कमी वेळेत शर्यत पूर्ण केली, तर युगांडाच्या जेकब किप्लिमोने २:००:२८ वेळेसह कांस्यपदक जिंकले.
इथिओपियाच्या टिग्स्ट असेफाने २:१५:४१ वेळेसह महिलांच्या गटात स्वत:चाच जागतिक विक्रम मोडला. तिने गेल्या वर्षी लंडनमध्ये २:१५:५० वेळेत मॅरेथॉन पूर्ण करून हा विक्रम प्रस्थापित केला होता. केनियाच्या हेलन ओबिरी आणि जॉयसिलीन जेप्कोसगेई अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी राहिल्या.
जयपूर : सवाई मानसिंह स्टेडियमवर झालेल्या सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स या सामन्यात नाणेफेक जिंकून हैदराबादने गोलंदाजीचा निर्णय प्रथम ...
सुरुवातीपासूनच, ही शर्यत काहीतरी खास घडणार असल्याचे संकेत देत होती. आघाडीच्या गटात सावे, केजेलचा, तीन वेळा विश्व क्रॉस–कंट्री चॅम्पियन ठरलेला जेकब किप्लिमो, ऑलिम्पिक चॅम्पियन तमिरात टोला, २०२२ लंडन मॅरेथॉन विजेता आमॉस किप्रुटो आणि डेरेसा गेलेटा यांचा समावेश होता. सहा धावपटूंचा हा गट पुढील १० किलोमीटर एकत्र धावला, पण ३० किलोमीटरपर्यंत (१:२६:०३) त्यांच्यातील अंतर वाढले होते. अधिक वेगाने धावण्याचे परिणाम दिसू लागले होते. शर्यतीचा निर्णायक टप्पा ३० ते ३५ किलोमीटरच्या दरम्यान आला. ५ किलोमीटरचा टप्पा १३:५४ मिनिटांत पार करून, सावे आणि केजेलचा पुढे गेले आणि किप्लिमो मागे पडला. किप्लिमो तिसऱ्या स्थानी राहिला. त्यानंतर आघाडीच्या दोन्ही धावपटूंनी पुन्हा वेग वाढवला आणि पुढील ५ किलोमीटरचे अंतर १३:४२ मिनिटांत पार केले, ज्यामुळे प्रत्येक पावलागणिक दोन तासांपेक्षा कमी वेळेत शर्यत पूर्ण करण्याची त्यांची शक्यता वाढत होती.
बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनचा ऐतिहासिक निर्णय! खेळाच्या अनेक नियमांमध्ये बदल
मुंबई : बॅडमिंटनचे सामने आता २१|३ पद्धतीऐवजी १५|३ गुणपद्धतीनुसार खेळले जातील. सामने आता तीन २१|२१ गेम्सए–ेवजी तीन १५|१५ गेम्समध्ये खेळले जाणार आहेत. ...
विद्यमान चॅम्पियन सावेने एक मैल अंतर शिल्लक असताना अखेरीस केजेलचाला मागे टाकले आणि एकटाच धावत राहिला. त्याने १:५९:३० वेळेत अंतिम रेषा ओलांडली. या कामगिरीसह, त्याने २०२३ मध्ये शिकागो येथे दिवंगत केल्विन किप्टम यांनी प्रस्थापित केलेला आधीचा जागतिक विक्रम ६५ सेकंदांनी मोडला. तो दोन तासांपेक्षा कमी वेळेत मॅरेथॉन पूर्ण करणारा पहिला खेळाडू ठरला.

# गुजरातने चेन्नईला नमविले

चेन्नई : आयपीएलच्या ३७ व्या सामन्यात गुजरात टायटन्सने यजमान चेन्नई सुपर किंग्सचा त्यांच्याच बालेकिल्ल्यात, म्हणजेच चेपॉक स्टेडियमवर पराभव केला. गुजरातने हा सामना तब्बल ८ गडी राखून जिंकत स्पर्धेत जोरदार पुनरागमन केले आहे. या विजयामुळे गुणतालिकेत मोठी खळबळ उडाली असून गुजरातने थेट पाचव्या स्थानी झेप घेतली आहे.
प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत चेन्नईला ७ बाद केवळ १५८ धावा मजल मारता आली. साई सुदर्शनच्या अर्धशतकाच्या जोरावर गुजरातने १६.२ षटकांत १६२ धावा करून सामना जिंकला.
एकवेळ सीएसके संघ शानदार सुरुवात करत होता. एकही विकेट न गमावता २१ धावा झाल्या होत्या. पण इथून कागिसो रबाडा आणि मोहम्मद सिराज यांनी अक्षरशः कहर केला. पुढच्या अवघ्या ७ चेंडूत संजू सॅमसन, उर्विल पटेल आणि सरफराज खान माघारी परतले. त्यानंतर डेवाल्ड ब्रेविस सुद्धा स्वस्तात बाद झाला आणि ३७ धावांवर सीएसकेचे ४ बळी पडले. या कठीण परिस्थितीत ऋतुराज गायकवाड आणि शिवम दुबे यांनी डाव साव–



रला. दोघांनी मिळून ५९ धावांची महत्त्वाची भागीदारी करत संघाला १०० च्या जवळ पोहोचवले. मात्र गायकवाडची फलंदाजी पूर्णपणे वेगळीच दिसत होती.
एका क्षणी तो ३६ चेंडूत फक्त २० धावांवर होता, जणू कसोटी सामना खेळत होता. पण त्यानंतर त्याने गियर बदलला आणि पुढच्या १३ चेंडूत ३० धावा काढत ४९ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. १४ ओव्हर्सनंतर सीएसकेचा स्कोअर फक्त ७५ होता. १२० पर्यंत पोहोचणंही कठीण वाटत होतं. पण इथून गायकवाडने आक्रमक रूप धारण केलं. शेवटच्या ६ ओव्हर्समध्ये उडघ ने तब्बल ८३ धावा ठोकत सामना पुन्हा जिवंत केला.१५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरा–तची सुरुवात अत्यंत स्फोटक झाली. सलामीवीर साई सुदर्शनने संयमी पण आक्रमक खेळी करत शानदार अर्धशतक झळकावले आणि साई सुदर्शनच्या ८७ धावांच्या जोरावर गुजरातने विजय मिळवला.
सुदर्शन व्यतिरिक्त, कर्णधार शुभमन गिलने ३३ धावा आणि जोस बटलरने नाबाद ३९ धावा केल्या. चेन्नईच्या फिरकी आणि वेगवान गोलंदाजांना चेपॉकच्या खेळपट्टीवर एकही विकेट काढणे कठीण झाले होते. गुजरातने केवळ २ गडी गमावून हे लक्ष्य सहज गाठले. या विजयाचा सर्वात मोठा फायदा गुजरात टायटन्सला झाला आहे. गुजरात टायटन्सने ८ सामन्यांत ४ विजय आणि ४ पराभवांसह ८ गुण मिळवून सातव्या क्रमांकावरून थेट पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे.

## नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अंगक्रिश रघुवंशीवर दंडात्मक कारवाई

मुंबई–कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यातील आयपीएल २०२६ च्या सामन्यानंतर, कोलकाता नाईट रायडर्सचा युवा फलंदाज अंगक्रिश रघुवंशीला सामन्यादरम्यानच्या त्याच्या आक्रमक वर्तनाबद्दल त्याच्या सामना शुल्काच्या २० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.आयपीएलने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ''कोलकाता नाईट रायडर्सचा फलंदाज आणि यष्टीरक्षक अंगक्रिश रघुवंशीला, सामना क्रमांक ३८ मध्ये आचारसंहितेच्या लेव्हल १ उल्लंघनासाठी त्याच्या सामना शुल्काच्या २० टक्के दंड आणि एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे.'' त्यात पुढे म्हटले आहे की, त्याने कलम २.२ चे उल्लंघन केले, जे सामन्यादरम्यान उपकरणे किंवा मैदाना–तील साहित्याच्या गैरवापराशी संबंधित आहे.रघुवंशीने आ–पली चूक कबूल केली असून सामनाधिकाऱ्यांचा निर्णय स्वीकारला आहे. आयपीएलच्या नियमांनुसार, लेव्हल १ उल्लंघनासाठी सामनाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असतो. केकेआरने लखनौविरुद्धचा सामना सुपर ओव्हरमध्ये जिंकला, परंतु या विजयादरम्यान रघुवंशीचे वर्तन चर्चेचा विषय बनले. एका तरुण क्रिकेटपटूकडून अशा वर्तनाची अपेक्षा नसते आणि त्याचा संघाच्या प्रतिमेवरही परिणाम होतो.ही घटना सामन्याच्या पाचव्या षटकात घडली, जेव्हा रघुवंशीला क्षेत्ररक्षणात अडथळा आणल्याबद्दल बाद देण्यात आले. या निर्णयानंतर, त्याचा संताप अनावर झाला आणि रागाच्या भरात त्याने आपल्या बॅटने सीमारेषेवरील कुशनवर प्रहार केला. इतकेच नाही, तर त्याने आपले हेल्मेट डगआऊटच्या दिशेने फेकले, जे आयपीएलच्या आचारसंहितेच्या विरोधात आहे.

**सचिन तेंडुलकरला सिक्सर मारायला सांगाल का?**

## २ लाईन गाण्याच्या विनंतीवर कैलाश खैर भडकला, नेमकं काय म्हणाला?



मुंबई–कैलाश खैर . बॉलिवूड इंडस्ट्रीतील जबरदस्त सिंगर आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक गाणी गायली. कैलाश खैर सध्या एका व्हिडीओमुळे चर्चेत आले आहेत. या व्हिडीओत कैलाश खैर यांना २ ओळी गाण्यासाठी कार्यक्रमातील अँकर आग्रह करतो. जेणेकरुन प्रेक्षकांचं मनोरंजन होईल. मात्र, कैलाश खैर यांना त्यांच्याकडे केलेली विनंती आवडलेली नाही. कैलाश खैर यांचं असं म्हणणं आहे की, यामुळे कलाकाराचा सन्मान कमी होतो. नुकतेच एका अवॉर्ड शोमध्ये त्यांच्याकडे अशीच गाण्याची रिक्वेस्ट करण्यात आली होती. मात्र, त्यांनी विनंती नाकारली. तसेच कलाकारांच्या सन्मानाबद्दल आपले मत व्यक्त केलं.
कैलाश खैर यांनी २५ एप्रिल रोजी दिल्लीतील ताज पॅलेस येथे आयोजित मसिक्स सिग्मा लीडरशिप समिट इन हेल्थकेअरफ या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. अवॉर्ड शो दरम्यान, होस्टने त्यांच्यासमोर एक विनंती केली. होस्टने त्यांना काही ओळी गाण्यास सांगितले . होस्टची विनंती ऐकताच कैलाश खैर नाराज झाले. कैलाश खैर म्हणतात, ममला हेच बदलायचे आहे. गायक आणि म्यूझिककडे केवळ काही ओळी गाऊन दाखवा आणि वातावरण निर्मिती करण्याच्या दृष्टीने पाहू नकाफ मळे मला खूप चुकीचे वाटते. अशा प्रकारच्या विनंती करु नकाफ, असं कैलाश खैर म्हणाले. यावेळी उदाहरण देत कैलाश खैर म्हणाले. मतुम्ही सचिन तेंडुलकरला सारखं षटकार मारायला सांगाल का? किंवा एखाद्या सैनिकाला सांगाल का की, आपली पोजिशन घेऊन फायर करा? असं कुणीही करत नाही. कलाकाराला विदुषक बनवू नका. कलाकार एक साधक असतो, त्याला मनोरंजनाचा साधन समजू नकाफ असंही कैलाश खैर म्हणाले.

# आरोपः वैभवच्या बॅटमध्ये एआय चीप'?

मुंबई –माणूस यशस्वी होतो तशी त्याच्या टीकाकारांची संख्येही वाढते असे म्हटले जाते. मात्र एखाद्या व्यक्तीच्या कार्यामध्ये उगाच खोट काढत राहणंही तितकेच वाईट असते. सध्या पाकिस्तानकडून असेच प्रयत्न सुरु असल्याचं दिसत आहे. पाकिस्तानमधील क्रिकेट तज्ज्ञ नौमान नियाझ यांनी भारतीय क्रिकेटमधील सध्या चर्चेत असलेला सर्वात तरुण क्रिकेटर वैभव सूर्यवंशीबद्दल विचित्र विधान केलं आहे. खरं तर नियाझ हे कायमच त्यांच्या अतिशयोक्तीपूर्ण विधानांसाठी ओळखले जातात. शनिवारी, २५ एप्रिल रोजी वैभवने आपल्या आयपीएल कारकिर्दीमधील दुसरं शतक झळकावल्यानंतर काही तासांमध्येच नियाझ पुन्हा बरळले आ–हेत. नियाझ यांनी वैभव सूर्यवंशी वेगाने धावा करण्यासाठी गैरप्रकार करत असल्याची शंका बोलून दाखवली आहे.
नियाझ यांनी तर्कविसंगत दावा करताना, वैभव सूर्यवंशीने त्याच्या बॅटमध्ये एआय चीप वापरली असून या चीपमुळेच त्याला फटके मारताना अधिक ताकद मिळत असल्याचं म्हटलं आहे. ''हा मुलगा नक्की आहे तरी कोण? याचा विचार व्हायला हवा. जागतिक




उत्तेजक प्रतिबंध संस्था (वाडा) ज्याप्रमाणे उत्तेजक चाचण्या घेते, त्याप्रमाणे त्याला एखाद्या प्रयोगशाळेत पाठवले पाहिजे,'' असं नियाझ यांनी म्हटलं आहे.
पुढे बोलताना, ''कदाचित त्याने आपल्या बॅटमध्ये 'एआय चिप' वापरली असावी. त्याचे खेळ अविश्वसनीय वाटतो. काय जबरदस्त खेळाडू आहे! मला असा भास झाला की तो थोडा संथ खेळत होता. यामुळे मला प्रश्न पडला की, हा माणूस नक्की आहे तरी कोण? जेव्हा तुम्ही १८ वर्षांचे असता, तेव्हा तुमच्या शरीरात स्नायू, बायसेप्स आणि ट्रायसेप्सची वाढ होत असते. पण हा तर अवघा १६ वर्षांचा आहे,'' असे म्हणत नियाझ यांनी वैभवच्या खेळाबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे.
वैभवचा जन्म २०११ मध्ये झाल्याचा संदर्भ भारताने याच वर्षी दुसऱ्यांदा एकदिवसीय विश्वचषक जिंकला होता याच्याशी जोडत नियाझ यांनी प्रतिक्रिया नोंदवली आहे. ''ज्या वेळी विराट कोहली विश्वविजेता होता, त्या वेळी याचा जन्म झाला होता. त्याच्याकडे खेळातील तांत्रिक कौशल्याइतकीच ताकद देखील आहे. तो मनगटाचा वापर करून फटकेबाजी करणारा खेळाडू आहे; शिवाय, जर तुम्ही त्याच्या फटक्यांचा 'आर्क' पाहिल्यास तो संपूर्ण मैदान व्यापून टाकतो. पूर्ण ३६० अंश क्षेत्र तो आपल्या फटकेबाजीने व्यापून टाकतो,'' असे नियाझ यांनी 'स्मॅशहीट' नावाच्या कार्यक्रमात मत व्यक्त करताना म्हटले.वैभव सूर्यवंशी हा सध्या के. एल. राहुल, विराट कोहली आणि अभिषेक शर्मा यांसारख्या स्फोटक आणि अव्वल दर्जाच्या खेळाडूंना ऑरेंज कॅपच्या शर्यतीमध्ये थेट टक्कर देताना दिसतोय. आठ सामन्यांमध्ये वैभवने ३५७ धावा केल्या.

# प्लेइंग इलेव्हनमधला मॅच विनर आयपीएल मधून बाहेर, मुंबईला जबर धक्का

मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये आधीच अडचणीत सापडलेल्या मुंबई इंडियन्सच्या चिंतेत आणखी भर पडली आहे. मुंबईचा स्टार परदेशी खेळाडू दुखापतीमुळे संपूर्ण मोसमातून बाहेर झाला आहे. सीएसकेविरुद्धच्या सामन्यात फिल्डिंग करत असताना मिचेल सॅन्टनर याला कॅच पकडत असताना उजव्या खांद्याला दुखापत झाली, यानंतर तो ताबडतोब ड्रेसिंग रूममध्ये गेला. सॅन्टनरची दुखापत गंभीर असल्यामुळे तो आयपीएलचे उरलेले सामने खेळू शकणार नाही. मुंबईने मिचेल सॅन्टनरचा बदली खेळाडू म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या स्पिनरला टीममध्ये आणलं आहे.
सॅन्टनरला कशी झाली दुखापत?
मुंबई आणि सीएसके यांच्यात २३ एप्रिलला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सामना झाला, तेव्हा कॅच पकडत असताना सॅन्टनर त्याच्या उजव्या खांद्यावरच कोसळला, त्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. याआधी सॅन्टनरला दिल्लीविरुद्धच्या सामन्यातही दुखापत झाली होती, त्यामुळे तो राजस्थानविरुद्धच्या सामन्यात खेळ–ला नव्हता, पण आरसीबी आणि गुजरातविरुद्धच्या सामन्यात सॅन्टनर पुन्हा मैदानात उतरला. मुंबई इंडियन्सने सॅन्टनरचा बदली खेळाडू म्हणून दक्षिण आफ्रिकेचा डावखुरा स्पिनर केशव महाराज याला टीममध्ये आणलं आहे. महाराजकडे आयपीएलचा फारसा अनुभव नाही. २०२४ आयपीएलमध्ये महाराज राजस्थानकडून २ सामने खेळला होता. टी–२० क्रिकेटमध्ये मात्र केशव महाराजचा अनुभव दांडगा आहे, त्याने २१८ टी–२० सामन्यामध्ये १९१ विकेट घेतल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या डअ२० लीगच्या ४ मोसमांमध्ये त्याने ३९ विकेट मिळवल्या. केशव महाराजच्या या अनुभवाचा फायदा मुंबईच्या कमजोर वाटणाऱ्या बॉलिंगला होऊ शकतो.२३ एप्रिलला सीएसकेविरुद्ध दारूण पराभव झाल्यानंतर मुंबई इंडियन्सना मोठा ब्रेक मिळाला आहे, ज्यात त्यांना स्वत:ची रणनीती बदलावी लागणार आहे. या मोसमात मुंबईची कामगिरी निराशाजनक झाली आहे. ७ सामन्यांमध्ये मुंबईने फक्त २ मॅच जिंकल्या असून त्यांचा ५ साम न्यांमध्ये पराभव झाला. पॉईंट्स टेबलमध्ये मुंबई नवव्या क्रमांकावर आहे. मुंबईचा पुढचा सामना २९ एप्रिल रोजी वानखेडे स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्ध होणार आहे.



# खरीप हंगामात शेतकऱ्यांना कुठलीही अडचण येऊ नये

## लातूर ग्रामीण विधानसभा खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठकीत आ. रमेशअप्पा कराड

**लातूर/प्रतिनिधी :** समाधानकारक पाऊस पडला की खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्याची घाई असते अशावेळी शेतकऱ्यांना हवे ते खत बी बियाणे मिळायला हवे मात्र अनेकदा शेतकऱ्यांची अडवणूक, फसवणूक होते जाणीवपूर्वक तुटवडा निर्माण केला जातो याची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी येणाऱ्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना कसलीही अडचण येणार नाही सुरळीत हंगाम पार पडावा याची दक्षता घ्यावी अशा सूचना लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी दिल्या.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघ कार्यक्षेत्रातील खरीप हंगाम २०२६ पूर्वतयारी व नियोजन आढावा बैठक लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार २७ एप्रिल २०२६ रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात झाली. या बैठकीस किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख, जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, रेणापूरचे उपसभापती शरद दरेकर, लातूर तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, रेणापूर तालुका कृषी अधिकारी नितीन कांबळे, औसा अधिकारी दत्तात्रय हाके, यांच्यासह विमा कंपनीचे संबंधित अधिकारी, गुण नियंत्रण कृषी अधिकारी, मंडल अधिकारी, उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी व इतर संबंधित उपस्थित होते.

या बैठकीत खरीप हंगाम २०२६ पूर्वतयारी अनुषंगाने पर्जन्यमान, पीक पेरणी व नियोजन, विविध कंपन्याची खते आणि बी बियाणे, पीक विमा स्थिती, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सहानुग्रह अनुदान योजना, पीएम किसान योजना, आपत्कालीन पीक नियोजन, क्षेत्र विस्तार व उत्पादकता वाढ, फलोत्पादन, सोयाबीन बियाणे नियोजन, पाणलोट विकास, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, नैसर्गिक आपत्ती यासह विविध विषयाचा तालुका निहाय आढावा आ. रमेशअप्पा कराड यांनी घेतला.

शेतकऱ्यांच्या गरजेनुसार युरिया, डीएपी खताचा आणि बियाण्याचा वेळेत पुरवठा करण्यात यावा, पेरणीसाठी खताची अडचण शेतकऱ्यांना येणार नाही याची काळजी घ्यावी. गावोगावच्या कृषी सेवा केंद्राकडून शेतकऱ्यांची अडवणूक आणि फसवणूक होणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दक्ष रहावे असे सांगून बैठकीत बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, पेरणीच्या काळात हव्या




त्या नामांकित कंपनीचे बियाणे मिळत नसल्याने बाजारात विविध कंपन्यांच्या नावाचे बोगस बियाणे उपलब्ध असते, सदरील बियाणे कुठल्या कंपनीचे आहे, ते अधिकृत आहे का, सर्टिफाईड आणि दर्जेदार आहे का याची माहिती घेतली जावी जेणेकरून शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

घरचे बियाणे पेरणी केल्यास उत्पादन कमी होते ही वस्तुस्थिती असल्याने नामांकित बियाण्याच्या मागणीकडे शेतकऱ्याचा कल असतो. महाबीजच्या बियाणेची टंचाई निर्माण झाल्यास त्याच तोडीचे पर्याय उपलब्ध करावे, खरीप पेरणी बरोबरच ऊस आणि फळबागासाठी खताची टंचाई होणार नाही याची काळजी घेऊन नियोजन करावे, येणारा खरीप हंगाम हा सुरळीत पार पडावा. सरकार विषयी राग रोष निर्माण होऊ नये. शेतकऱ्यांना समाधान मिळाले पाहिजे. शेतकऱ्यांची तक्रार येणार नाही त्यांची अडवणूक आणि अडचण होणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दक्ष राहून काम करावे असेही लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

## लातूर जिल्ह्यात २९ व ३० एप्रिल रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा; तरुणांना 'शिका आणि कमवा' योजनेची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी २९ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत २९ एप्रिल रोजी देवणी येथील कै. रसिका महाविद्यालय आणि ३० एप्रिल रोजी जळकोट येथील महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय येथे सकाळी १० वाजता मुलाखती पार पडणार आहेत.

या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित टोयोटा किर्लोस्कर मोटार प्रा. लि. ही कंपनी सहभागी होणार असून, त्यांच्या 'टोयोटा कौशल्या' उपक्रमांतर्गत 'शिका आणि कमवा' या तत्त्वावर उमेदवारांची निवड केली जाणार आहे. या संधीसाठी १८ ते २१ वयोगटातील दहावी किंवा बारावी उत्तीर्ण, तसेच पदवी शिक्षण घेत असलेले किंवा पदवीधर उमेदवार पात्र असतील. इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम आणि पासपोर्ट फोटो यांच्या तीन प्रतींसह स्वखर्चाने संबंधित ठिकाणी उपस्थित राहावे. या सुवर्णसंधीचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त तरुणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहायक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले असून अधिक माहितीसाठी दत्तात्रय कांबळे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२३८४६५) किंवा लहू भंडारे (भ्रमणध्वनी क्र. ८०५५९९२९००) यांच्याशी संपर्क साधावा.

## 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारासाठी ४ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन; २० मे रोजी पुण्यात होणार गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने सन २०२६ सालासाठी 'मधुमित्र' आणि 'मधुसखी' पुरस्कारांसाठी नामांकने मागविण्यात येत आहेत. मधमाशीपालन व्यवसायास गती मिळावी व या क्षेत्रातील मधपाळांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने गेल्या तीन वर्षांपासून मंडळाने हा उपक्रम सुरू केला असून, यात मधमाशीपालनात दीर्घकाळ यशस्वीपणे काम करणाऱ्या मधपाळांचा सन्मान केला जातो. या पुरस्कार योजनेत प्रथम ११ हजार रुपये, द्वितीय ७ हजार रुपये आणि तृतीय ५ हजार रुपये अशा स्वरूपाचे तीन पुरस्कार दिले जाणार असून, यातील एक पुरस्कार महिला मधपाळासाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

इच्छुक उमेदवारांनी आपले नामांकन अर्ज ४ मे २०२६ पूर्वी मंडळाच्या जिल्हा कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. या पुरस्कारांचे अर्ज प्रत्येक जिल्ह्याच्या खादी मंडळाच्या कार्यालयात किंवा मंडळाच्या ु.ीज्ञींळल.ीस या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. २० मे २०२६ रोजी 'जागतिक मधमाशी दिना'च्या औचित्याने पुणे येथे एका भव्य समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जातील. याविषयी अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग कार्यालय, लातूर ( दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०१४४) किंवा मध संचालनालय, महाबळेश्र्वर (दूरध्वनी क्रमांक ०२१६८-२६०२६४) या क्रमांकावर संपर्क साधता येईल. जास्तीत जास्त मधपाळांनी या पुरस्कारासाठी आपली नामांकने पाठवावीत, असे आवाहन मंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील व जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांनी केले आहे.

## लातूर येथे २ ते ११ मे दरम्यान उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर; १६ खेळांच्या प्रशिक्षणाची खेळाडूंना संधी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा क्रीडा कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने १० ते १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी २ ते ११ मे २०२६ या कालावधीत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे होणाऱ्या या शिबिरात क्रिकेट, खो-खो, कुस्ती, थलेटिक्स, रायफल शूटिंग, लॉन टेनिस, जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, बॉक्सिंग, कराटे, स्केटिंग, योगा आणि बास्केटबॉल अशा एकूण १६ क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी दिली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या शिबिरात सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले असून अधिक माहितीसाठी तालुका क्रीडा अधिकारी जयराज मुंढे (भ्रमणध्वनी क्र. ८२७५२७३९१७) किंवा क्रीडा मार्गदर्शक चंद्रकांत लोदगेकर (भ्रमणध्वनी क्र. ९४२०२९२१५५) यांच्याशी संपर्क साधावा.

## वीजपुरवठ्यामुळे खंडित झालेला पाणीपुरवठा सुरळीत

**लातूर/प्रतिनिधी :** रविवारी वीज पुरवठ्यात बिघाड झाल्यामुळे धनेगाव येथील मांजरा प्रकल्पावरून शहराला होणारा पाणीपुरवठा काही काळासाठी खंडित झाला होता. परंतु सायंकाळीच वीजपुरवठ्यातील बिघाड दुरुस्त करण्यात आला असून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत झाला असल्याचे मनपा प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले.

रविवार दि.२६ एप्रिल रोजी धनेगाव येथून पाणीपुरवठा करणाऱ्या प्रकल्पावरील प्रकल्पाला एक्सप्रेस फीडरद्वारे होणारा पाणीपुरवठा तांत्रिक कारणांनी खंडित झाला होता. युद्धपातळीवर काम करून तो सायंकाळपर्यंत पूर्ववत करण्यात आला. परंतु या बिघाडामुळे रविवारी दुपारी १२ ते सायंकाळी ७ या कालावधीत प्रकल्पावरून पाणी उचलण्याची प्रक्रिया थांबलेली होती. सायंकाळी ती पुन्हा सुरू झाली.यामुळे काही काळासाठी शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन विस्कळीत झाले होते.सोमवारी ते पूर्ववत सुरू झाले आहे.

शहरातील नागरिकांना दर पाचव्या दिवशी नियमितपणे पाणीपुरवठा केला जात आहे.उन्हाळ्याचे दिवस असले तरी पाणी वेळेत मिळावे याची काळजी प्रशासनाच्या वतीने घेतली जात आहे.तांत्रिक बाबींमुळे काही वेळा अडचणी निर्माण झाल्या तरी तात्काळ उपाययोजना करून पाणीपुरवठा सुरळीत केला जात असल्याची माहिती मनपाच्या वतीने देण्यात आली आहे.

## म.बसवेश्वर महाविद्यालयात धर्मवीर वीरुपाक्ष श्री देशिकेंद्र महाराज स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** धर्मवीर वीरुपाक्ष श्री देशीकेंद्र महाराज यांनी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी लावलेल्या शैक्षणिक संकुलाच्या रोपट्याचे आज अकरा विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून वटवृक्षांमध्ये रूपांतर झाल्याचे आपणास दिसून येत आहे.

धर्मवीर वीरुपाक्ष श्री देशिकेंद्र महाराजांचा स्मृतिदिन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी धर्मवीर वीरुपाक्ष श्री देशिकेंद्र महाराज यांच्या प्रतिमेला प्राचार्य कक्षामध्ये महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक डॉ.भास्कररेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, पर्यवेक्षक डॉ. गुणवंत बिरादार, उपप्राचार्य प्रा.वीरभद्र बाळे, मुख्याध्यापक शिवाजी कोळी, उपमुख्याध्यापक शिवानंद स्वामी, डॉ.मनोज मोटे, डॉ.संजय गवई, डॉ.दीपक चाटे, रो.शिवराज मिसाळ, अधीक्षक सिद्राम चंदनगिरे, संस्था कार्यालय प्रमुख गुरुलिंग शेटे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.



त्यानंतर करबसप्पा महिला भजनी मंडळातील सोमनाथ किडिले, राजेंद्र वाघमारे, सिद्धेश्वर चौंडा, पद्मिनी मुनाळे, मनीषा ठेसे, नंदा बिडवे, उमाताई महाजन, सुषमा बिडवे, सुनिता तावस्कर, सविता हासाळे, ज्योती मुनाळे यांनी भजनाच्या माध्यमातून सेवा समर्पित केली.

त्यानंतर पाचशे घर मठ संस्थान येथील धर्मवीर वीरुपाक्ष श्री देशीकेंद्र महाराजांच्या स्मृतिस्थळाला सर्व मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रा.व्ही.जी.स्वामी आणि शिवशंकर स्वामी यांनी प्रार्थना व आरती म्हटली.

यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर होराजन तर्फे महाविद्यालयासमोरील खुल्या जागेमध्ये ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी सिमेंटच्या बाकड्यांचे लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर मुलांच्या अभ्यासिकेमध्ये महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रत्नाकर बेडगे यांनी केले तर डॉ.भास्कररेड्डी नल्ला यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, आणि श्री देशीकेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## नांदेड येथे ३० एप्रिल रोजी कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील शेतकरी, लघुउद्योजक व सुशिक्षित बेरोजगारांना स्वावलंबी बनवून त्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता नांदेड येथील श्री शंकरराव चव्हाण सभागृह, विष्णुनगर येथे भव्य 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे.

इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती आणि वनार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मेळाव्यात लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातील लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये विविध महामंडळांच्या कर्ज योजना, प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जातील त्रुटी कशा टाळाव्यात, यावर सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन दिले जाईल.

या विशेष सोहळ्यात इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना सशर्त हेतुपत्र (एलओआय), मंजुरी पत्रे, प्रशस्तीपत्रे व मेडलचे वाटप करण्यात येणार असून ट्रॅक्टर व इतर वाहनांचेही वितरण केले जाणार आहे. या संधीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेडचे जिल्हा व्यवस्थापक सौदारजी नारायण झुंझारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी . www.msobcfdc.org. या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन स्थित जिल्हा कार्यालयाशी (संपर्क: ०२३८२-२५३३३४) संपर्क साधावा.

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी वाहिली माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांना श्रद्धांजली, पाटील कुटुंबियांचे केले सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय संसदेचे सर्वोच्च सभागृह असलेल्या राज्यसभेत अभ्यासू, समाजाभिमुख सदस्य अशी ओळख निर्माण केलेले माजी खासदार दिवंगत डॉ. गोपाळराव पाटील यांनी लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नचे जनक आणि आपल्या कार्याच्या माध्यमातून लातूर शहराची जागतिक पातळीवर ओळख निर्माण केली आहे, अशी भावना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, आदरणीय डॉ. गोपाळराव पाटील यांचे नुकतेच निधन झाले. माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी सोमवार दि. २७ एप्रिल रोजी सकाळी लातूर शहरातील जुना औसा रोड परिसरातील



सच्चिदानंद गोपाळराव पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांचे सुपुत्र सच्चिदानंद पाटील व कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला.

यावेळी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले की, जुन्या पिढीतील बालरोग तज्ञ म्हणून, आदरणीय डॉ. गोपाळराव पाटील यांनी लातूर, धाराशिव जिल्ह्यात सेवावृत्तीने आरोग्य सेवा केली. शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाविद्यालय, जिजामाता विद्यालय, यशवंत विद्यालय, संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल या व इतर शाळा महाविद्यालयातून शहरी तसेच ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुला-मुलींना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून दिले. या शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्तेवर शिक्षक, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा पायंडा त्यांनी पाडला. त्यामुळेच लातूरात आदर्श असा शैक्षणिक पॅटर्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्र आणि देशभरातील अनेक संस्थांमध्ये आता या शैक्षणिक पॅटर्नचे अनुकरण होत आहे. या शाळा महाविद्यालयात शिकलेले लाखो विद्यार्थी जगभरात डॉक्टर, इंजिनिअर व इतर उच्चपदावर अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. आदरणीय डॉ. गोपाळराव पाटील यांनी लायन्स क्लबच्या माध्यमातून, मोठे सामाजिक कार्य उभा केले आहे, त्यांच्या विचाराचा आणि कार्याचा वारसा पुढे चालवण्याची जबाबदारी आता आपल्या सर्वांची असल्याचे याप्रसंगी श्रद्धांजली वाहताना नमूद केले आहे.

पाटील कुटुंबीय आणि देशमुख कुटुंबीयांचे अनेक पिढ्यांपासून स्नेहाचे आणि प्रेमाचे संबंध राहिले आहेत. आगामी पिढ्यांमध्येही तो स्नेह कायम राहील, असा विश्र्वास याप्रसंगी त्यांनी व्यक्त केला. आदरणीय डॉ. गोपाळराव पाटील साहेब यांनी बालरोगतज्ञ म्हणून मी लहान असताना माझ्या आरोग्याचीही काळजी घेतली असल्याचे सांगून त्यांचा स्नेह त्यांचे विचार व कार्य आपण कदापिही विसरू शकणार नसल्याचे यावेळी म्हटले आहे.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महापौर जयश्री सोनकांबळे, विनायक पाटील, शहाजी पाटील, साहेबराव पाटील, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, सीए ऋषिकेश पाटील, गणेश एसआर देशमुख, आशिष पाटील, प्रा.संजय जगताप, भालचंद्र सोनकांबळे, अक्षय देशमुख, मनोज चिखले, श्रीशैल गडगडे आदिसह पाटील कुटुंबीय उपस्थित होते.

## मानसिक आरोग्य आढावा मंडळावर अशासकीय सदस्यांना अर्ज करण्याचे आवाहन

- अर्ज करण्यासाठी शुक्रवारपर्यंत अंतिम मुदत
- मंडळात लातूर, नांदेड, बीड,धाराशिव जिल्ह्याचा समावेश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर, बीड मानसिक आरोग्य आढावा मंडळावर अशासकीय सदस्य पदासाठी इच्छुकांनी सर्व संबंधित कागदपत्रांसह अर्ज आरोग्य संकुल, दुसरा मजला उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ लातूर कार्यालय, नवीन जिल्हाधिकारी कार्यालया शेजारी, लातूर येथे व्यक्तीशः किंवा कार्यालयाच्या ddhslatur2008yahoo.com व ddhsest12rediffmail.com मेलवर सादर करावा.

अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ०१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत आहे. याबाबत अधिक माहिती पाहण्यासाठी https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. अधिकाधिक इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन लातूरचे प्रभारी उपसंचालक डॉ. संजय ढगे यांनी केले आहे.

राज्य शासनाने राज्यातील १६ ठिकाणी मानसिक आरोग्य आढावा मंडळ स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. लातूर परिमंडळांतर्गत लातूर मानसिक आरोग्य आढावा मंडळासाठी लातूर आणि नांदेड, बीड मानसिक आरोग्य आढावा मंडळासाठी बीड आणि धाराशिव जिल्ह्याचा समावेश आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्कः (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# जिप महिला व बालकल्याण सभापती यांच्या दालनाच्या नुतणीकरणाचा शुभारंभ

## लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांचा पुतळा परिसर तात्काळ सुशोभीकरण करण्यात यावे
## जिपच्या अधिकाऱ्यांना लातूर ग्रामीणचे आ. रमेशअप्पा कराड यांची सूचना


**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात लावण्यात आलेली झाडे बाग बगीचा वाळून गेला असून दुरावस्था झाली याबाबत तात्काळ योग्य ती दखल घेऊन पुतळा परिसराचे सुशोभीकरण तातडीने करण्यात यावे अशी सूचना जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केल्या आहेत.

लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या नवनिर्वाचित सभापती सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले यांच्या नूतनीकरण दालनाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते सोमवारी सकाळी करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी एस. जे. तडवी, महिला बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जे. एस. शेख, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, नाथसिंह देशमुख, ओमप्रकाश गोडभरले, जिप सदस्य महादेव साळुंके, सौ. छायाताई चिंचोलकर, तानाजी बिराजदार, उपसभापती शरद दरेकर, देविदास कुटवाड, जगदीश कुलकर्णी, अनिल भिसे, सुरज शिंदे, सतीश आंबेकर, उद्धव काळे, ॲड. दशरथ सरवदे, महेंद्र गोडभरले यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनेची आ. रमेशअप्पा कराड यांनी महिला सक्षमीकरणासाठी स्वयंरक्षा प्रशिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, लाडकी बहीण योजना, बालकांच्या आरोग्य व शिक्षणासाठी अंगणवाडी, लघुउद्योग अनुदान योजना, कुपोषण निर्मूलन यासह विविध योजनाची माहिती जाणून घेतली. या विभागाच्या विविध शासनाच्या योजनाची प्रसिद्धी करून योजना सक्षमपणे आणि प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्याची काम करावे. जिल्हा परिषदेच्या परिसरात येताच लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुतळ्याची झालेली दुरावस्था पाहून मनाला दुःख झाल्याचे सांगून या परिसराचे तातडीने व सुशोभीकरण करण्यात यावे अशा सूचना जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आ. कराड यांनी यावेळी केल्या.

याप्रसंगी आ. कराड आणि इतर अनेक मान्यवरांचे महेंद्र गोडभरले यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले. यावेळी दीपक वांगस्कर, बन्सी भिसे, सुधाकर काळे, आदिनाथ मुळे, रमाकांत फुलारी, संजय ठाकूर, उत्तम चव्हाण, अशोक सावंत, ओम चव्हाण, लक्ष्मण यादव, नारायण राठोड, रुपेश काळे, अशोक राठोड, राजेंद्र काळे, सुरेश बुड्डे, बाबा भिसे यांच्यासह अनेक जण होते.



आज ग्रामपंचायत कार्यालय बावची व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बावची तर्फे कुमारी दिपाली राजाभाऊ नारगुंडे यांची महाराष्ट्र पोलीस मुंबई येथे नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला व तसेच सर्वांनी पुढील वाटचालीसाठी हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा दिल्या यावेळी गावातील माता भगिनी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते

लातूर येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त

## पोलीस मुख्यालय प्रांगणात होणार राष्ट्रध्वज वंदन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त शुक्रवार, १ मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजता पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होणार आहे. या मुख्य शासकीय समारंभाचे आयोजन बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणावर करण्यात आले आहे.

याप्रसंगी राष्ट्रध्वज वंदन आणि भव्य संचलन (परेड) पार पडणार आहे. या कार्यक्रमाला लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी राष्ट्रीय किंवा समारंभीय पोषाख परिधान करावा. तसेच, सर्व निमंत्रितांनी सोहळा सुरू होण्यापूर्वी १५ मिनिटे अगोदर कार्यक्रमस्थळी आसनस्थ व्हावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. राष्ट्रध्वज वंदनाचा मुख्य शासकीय समारंभ सकाळी ८ वाजता होईल. या समारंभात सर्वांना सहभागी होता यावे, यासाठी इतर कार्यालये किंवा संस्थांनी १ मे रोजी सकाळी ७.१५ ते ९ या वेळेत राष्ट्रध्वजवंदन किंवा इतर कोणतेही शासकीय समारंभ आयोजित करू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. एखाद्या कार्यालयाला किंवा संस्थेला स्वतंत्रपणे ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित करायचा असल्यास तो सकाळी ७.१५ पूर्वी किंवा सकाळी ९ नंतर आयोजित करावा.


**NAME OF CHANGE DECLARATION**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH KALIM PAPA MIYA TO SHAIKH KALIM PAPAMIYA

Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SHAIKH KALIM PAPAMIYA will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :- SHAIKH KALIM PAPA MIYA.
NEW NAME:- SHAIKH KALIM PAPAMIYA.
Address :- JUNA AJONSONDA ROAD, CHAPOLI, DIST. LATUR - 413513
AADHAR NO.- 640867904136
Mob. No. 8600371307


### गोमातेला राष्ट्रमातेचा म्हणून दर्जा द्या : उदगीरात रॅली

**उदगीर/प्रतिनिधी :** गोमाता संरक्षण व तिला 'राष्ट्रमाते'चा दर्जा देण्याच्या मागणीसाठी उदगीर शहरात सोमवारी गोसन्मान रॅली काढून ५ हजार जणांच्या सह्यांचे निवेदन काढण्यात आलेल्या रॅलीतील विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांमार्फत महामहिम राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल व मुख्यमंत्री यांना देण्यात आले.

### हालचाल ..

निवडणूक समयांस
चाललेली हालचाल
बुध्दी न् बळाचाडाव
कुणाचीकाय रे चाल

भेटतात मोठे नेतोबा
विचारायं हालहवाल
रात्रीअपरात्रीकधीही
विचारेआहां खुशाल

सवय माध्यमांना हो
केवळकरावा बवाल
किंतु परंतु काय हेतू
करतराहतात सवाल

घोडे दौडाया लागले
सापडताकुठेही नाल
काही घडेल अघटित
तोंडे वेंगाडी चवचाल

चॅनेल बाजार भरवले
विकू आपापला माल
चमचमीत का लागते
खरी लोकांची कमाल

नक्राश्रूचा वाहतो पूर
भिजून चिंबले रुमाल
नवीनसोयरिक जमवू
का गुलाबी झालेगाल

बातमीचा हत्ती बनला
बेडकांनो कसे फुगाल
बोथट झालेत विचार
कुशाग्रबुध्दीही कंगाल

– **हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते मान्यवर वस्त्रदालनच्या अरण्या कलेक्शनचे उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते सोमवार दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळी लातूर शहरातील मेन रोडवरील लक्ष्मीकांत कर्वा यांच्या मान्यवर वस्त्रदालनातील अरण्या कलेक्शनचे उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मान्यवरांसह दालनाची पाहणी केली.



यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर महानगरपालिकेचे उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, माजी महापौर दीपक सुळ, डॉ. चेतन सारडा, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. सतीश देशमुख, डॉ. पवन लड्डा, डॉ. विक्रम सारडा, डॉ. अजय पुनपाळे, अभिजीत देशमुख, लक्ष्मीकांत कर्वा, योगेश कर्वा, अर्पित कर्वा, चिन्मय कर्वा, २१ शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, संतोष देशमुख, गणेश एसआर देशमुख, फैसलखान कायमखानी, लक्ष्मीकांत सुद, संजय निलेगावकर, प्रसाद उदगीरकर, आनंद लाहोटी, सुदेश ब्रिजवासी, मिनू अग्रवाल, अजय शहा, विशाल जाधव, इसरार सगरे, सोनू डगवाले, बंडू किसवे, रतन बिदादा, व्यंकटेश पुरी, मुक्तार शेख, इस्माईल शेख, चापसी, आसिफ बागवान, प्रा.प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, शरद देशमुख, महेश देशमुख, अरूण तापडिया, रिषभ ब्रिजवासी, रितेश माने, सागर बोरा, दत्ता अंबेकर, सोनू दोंतिलवार, राधेशाम धुत, जयेश बजाज, दिपक वारद, विजय रांदड, प्रफुल्ल जैन, रतन बिदादा, राजू मिणियार आदीसह कर्वा कुटुंबीय मित्रपरिवार काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, मान्यवर दालन सुरू करण्याची कल्पना काही वर्षांपूर्वी लक्ष्मीकांत कर्वा यांनी मला सांगितली होती. कर्वा परिवाराचा नेहमी आगळे वेगळे करण्याचा प्रयत्न राहिलेला आहे. देशमुख व कर्वा कुटुंबीयांचे नाते हे पिढ्यानपिढ्याचे आहे. आपण एका गावचे एका मातीतील आहोत हा विचार अधिक बळकट इतर विचारापेक्षा आहे. हेतू शुद्ध ठेवून जे व्यवसायात पडतात त्यांना यश हमखास मिळते या दालनाच्या विक्रीचा स्ट्राइक रेट हा सर्वाधिक आहे. लातूरमध्ये चांगल्या गोष्टीला पाठिंबा लातूरकर देतात. लातूर शहराच्या जडणघडणीत व विकासात प्रत्येकाचे योगदान आहे लातूरमध्ये प्रत्येकाला आपले स्वप्न साकारण्यासाठी आम्ही सर्वतोपरी मदत करू, येणाऱ्या काळात मान्यवर दालनाचा विस्तार व्हावा, असे सांगून कर्वा कुटुंबीयांना व्यवसाय वाढीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ओमप्रकाश झुरळे यांनी केले तर प्रास्ताविक चिन्मय लक्ष्मीकांत कर्वा यांनी करून मान्यवर ब्रँडची सविस्तर माहिती दिली तर लक्ष्मीकांत कर्वा यांनी मनोगत व्यक्त केले तर शेवटी आभार अर्पित कर्वा यांनी मानले.

यावेळी लक्ष्मीकांत सोनी यांची माहेश्वरी समाजाचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-

संपर्क
8600025070
9028376965

प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


## बावची येथे विद्यार्थिनीचा गौरव – मुंबई पोलीस दलात निवड

**बावची/बालाजी बादाडे :** बावची येथील जि.प.प्राथमिक शाळा येथे कु. दिपाली सोनाली नारायण नारगुंडे हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिचा उत्साहात सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थान शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. विश्वनाथ चपटे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्षा सौ. सूचिताई जाधव, सरपंच मा. तानाजी भैय्या देशमुख, पोलिस क्राईमचे उपसंपादक श्री. बालाजी बादाडे, सोसायटीचे चेअरमन मा. प्रकाश जाधव, माजी अध्यक्ष श्री. रविंद्र जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच अंगणवाडी सेविका सौ. शामल पाटील, सौ. अनुसया चपटे, सौ. छाया डिगुळे, श्री. अविनाश बोराडे, श्री.अरुण जाधव पालक प्रतिनिधी व ग्रामस्थ, तसेच कु. दिपालीचे आई-वडील मोठ्या अभिमानाने उपस्थित होते. शाळेतील शिक्षिका श्रीमती चौत्राबाई गोविंदराव म्हेत्रे मॅडम यांच्या उपस्थितीत विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.




कार्यक्रमात मान्यवरांनी तिचा यथोचित सन्मान केला.व कु.दिपालीच्या यशाबद्दल अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांसाठी हा प्रेरणादायी क्षण ठरला.

आभार प्रदर्शनानंतर अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६